RNI : MAHMAR/2022/88796
www.vidarbhkesari.com | Vidabh Kesari News | 90969 45629 | @vidarbhkesari
vidarbhkesari21@gmail.com

दैंनिक विदर्भाचा मानबिंदू
# विदर्भ केसरी
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
www.vidarbhkesari.com

अमरावती
११ गुरुवार
मार्च २०२६
✻ वर्ष ५ ✻ अंक २९२
✻ पृष्ठ : ६ ✻ मूल्य रु : ३




## रुपाली चाकणकर क्रमांक एकच्या खोटारड्या:


**▸विदर्भ केसरी।**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणामुळे राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. खरात यांच्या वैयक्तिक आयुष्यातील वाद किंवा त्यांच्यावरील आरोपांबाबत आपल्याला कोणतीही कल्पना नसल्याचे चाकणकर यांनी स्पष्ट केले होते. मात्र, शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी एका वृत्तपत्राचा जुना संदर्भ समोर आणत चाकणकर यांचा हा दावा खोडून काढला आहे. अंधारे यांनी सादर केलेल्या माहितीनुसार, खरात यांच्याशी संबंधित महिला शोषणाचे प्रकरण आणि त्यात रुपाली चाकणकर यांच्या एका पत्राचा स्पष्ट उल्लेख असल्याचे दिसून येत आहे. सुषमा अंधारे यांनी असा दावा केला आहे की, अशोक खरातच्या गैरकृत्यांबाबत बातमी प्रसिद्ध करणाऱ्या एका वृत्तपत्राकडून रुपाली चाकणकर यांनी वर्षभरापूर्वी लेखी माफीनामा लिहून घेतला होता. जर चाकणकर यांना खरातच्या प्रकरणाची माहितीच नव्हती, तर मग त्यांनी एका वर्षापूर्वी संबंधित वृत्तपत्राकडून माफीनामा का मागितला? असा थेट सवाल अंधारे यांनी उपस्थित केला आहे.

# नववर्षाच्या स्वागतासाठी अवघा महाराष्ट्र सज्ज

**▸विदर्भ केसरी।**

राज्यात हिंदू नवीन वर्ष उद्यापासून सुरू होत आहे. गुढी पाडव्याचा दिवस म्हणजे चैत्र शुक्ल प्रतिपदेचा दिवस. हा दिवस संस्मरणीय करण्यासाठी प्रत्येक हिंदू माणूस घरासमोर गुढ्या उभारत असतो. गुढी पाडव्याच्या निमित्ताने शोभायात्रा काढल्या जातात. तसेच धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन केलं जातं. या शिवाय घरात पुरणपोळीचा बेतही केला जातो. या नवीन वर्षाच्या स्वागतासाठी प्रत्येकजण सज्ज झाला आहे. शेवटची तयारीही जय्यत सुरू झाली आहे.



चैत्र शुक्ल प्रतिपदेला म्हणजेच गुढी पाडव्याला संपूर्ण गावाने हिंदू नववर्षाचे जोरदार स्वागत करायला हवे या विचारांतून डोंबिवलीतून सुरु झालेल्या गुढी पाडवा नववर्ष शोभायात्रेला जगभरातील मराठी आणि हिंदू समुदायाने आपलेसे केले आहे. डोंबिवलीतील शोभायात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवाराच्या माध्यमातून केले जाणारे अनोखे उपक्रम. यंदा डोंबिवलीकर परिवारातर्फे वंदे मातरम गीताला दीडशे वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने अतिशय आशयघन चित्ररथ लक्षवेधी ठरणार आहेत. वंदे मातरमचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव आणि रास्व संघाच्या पंचसूत्रीवर आधारित चित्ररथाच्या संकल्पनेला डोंबिवलीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल अशी अशा डोंबिवलीकर सांस्कृतिक परिवाराचे प्रवर्तक भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केली. या वर्षीचे अजून एक खास आकर्षण ठरणार आहे दीडशे फुटांची गुढी. विशाल हिंदुत्व आणि भव्य सांस्कृतिक सोहळ्याचे प्रतीक म्हणून ही महाकाय गुढी डौलाने उभी राहील, असे प्रतिपादन प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले.

### पुण्यात जय्यत तयारी

■ गुढीपाडवा सणाच्या पाश्वभूमीवर कलात्मक, सुबक, रंगीबेरंगी गाठ्यांनी पुण्याच्या भोरमधील बाजारपेठेतील दुकानं सजली आहेत. गुढीला नैवद्य म्हणून लागणाऱ्या रंगीबेरंगी साखरेच्या गाठ्या खरेदी करण्यासाठी नागरिक गर्दी करताना दिसत आहेत. युद्ध परिस्थितीमुळं उत्पादन खर्च वाढला असल्याने यंदा गाठीच्या बाजारभावात चाळीस टक्क्यांची दरवाढ झाली आहे. पारंपरिक पध्दतीने बनविलेल्या 20 ग्रॅमपासून एक किलो पर्यंतच्या गाठी विक्रीसाठी बाजारात आल्या आहेत.

### बांबूची मागणी वाढली

■ गुढीपाडवा सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत बाबुंची मागणी वाढली आहे. साडेतीन मूर्त्यांपैकी एक असणारा गुढीपाडवा सण उद्यावर येऊन ठेपल्याने, पुण्याच्या भोरमध्ये पाडव्याल्या गुढी उभारण्यासाठी लागणाऱ्या बांबूची मोठी आवक झाली आहे. नागरिकही बांबू खरेदीसाठी गर्दी करताना दिसत आहेत. बांबूंच्या उंचीनुसार 60 रुपयांपासून ते 200 रुपयांपर्यंत बांबूची विक्री होत आहे. 6 फुटांपासून ते 25 फुटांपर्यंत उंचीचे बांबू बाजारात विक्रीसाठी दाखल झाले आहेत. भोर तालुक्यातील हिरडस मावळ भागातून पाडवा सणाच्या 15 दिवसआधी डोंगर दऱ्यातून बांबूची तोड करून भोर शहरासह विविध जिल्ह्यात हे बांबू विक्रीसाठी पाठवले जातात. बांबुच्या विक्रीतून गेल्या चार पाच दिवसात मोठी आर्थिक उलाढाल झाली आहे. मागणी वाढून दर चांगला मिळत असल्यानं बांबू उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान पहायला मिळत आहे.

### अनोखी स्पर्धा, घसघशीत बक्षिस

■ तसेच यंदाच्या वर्षी देशभक्तीची अनेक रूपं अशा आशयाची संकल्पना राबविण्याचे ठरवले असून "क्रांतिकारी देशसेवक" वेशभूषा स्पर्धा होणार आहे. 5 वर्षांवरील व्यक्तींसाठी ही वेशभूषा स्पर्धा खुली असून स्वराज्यासाठी, स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आणि एकूणच भारत देशासाठी त्याग करणाऱ्या व्यक्तीची हुबेहूब वेशभूषा करणाऱ्या स्पर्धकांना पारितोषिकांनी सन्मानित करण्यात येणार आहे. विजेत्यास 25,000 रुपयांची रोख रक्कम देण्यात येणार असून उपविजेत्यास 15,000 त्याचबरोबर अन्य पारितोषिके देण्यात येणार असल्याची माहिती चव्हाण यांनी दिली. गतिमंद असल्यामुळे आपल्या कुटुंबाने रस्त्यावर सोडून दिलेल्या अनाथ अशा गतिमंद मुलींकडून गुढीपाडव्यानिमित्त गुढ्या बनवण्यात आल्या आहेत. धुळे शहरात असलेल्या यमुनाबाई शैक्षणिक सांस्कृतिक मंडळाची संस्कार बालगृह ही अनाथ गतिमंद मुलींची शाळा आहे.

दैंनिक विदर्भाचा मानबिंदू
विदर्भ केसरी
मुख्य संपादक : अमोल कंटाळे
!! पाहिजेत !!
**कार्यालय व्यवस्थापक** (Office Manager)
'दैनिक विदर्भ केसरी'च्या दर्यापूर येथील कार्यालयासाठी एक सक्षम, अनुभवी आणि तरुण कार्यालय व्यवस्थापक पाहिजे आहे.
पात्रता आणि आवश्यकता:
पत्रकारिता क्षेत्रातील ज्ञान तसेंच राजकीय पत्रकारिता आणि वृत्तपत्र कार्यालयाच्या कामाचा किमान २ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे.
**उत्तम जनसंपर्क:** स्थानिक राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय वर्तुळात चांगला जनसंपर्क असणे महत्त्वाचे.
**संगणक ज्ञान:** आणि इंटरनेटचे प्राथमिक ज्ञान असणे आवश्यक स्वतःची दुचाकी असणे अनिवार्य आहे.
■ शिक्षण: कोणत्याही शाखेचा पदवीधर
■ आकर्षक मानधन: पात्र उमेदवाराला योग्य आणि आकर्षक मानधन दिले जाईल.
■ एक प्रतिष्ठित आणि वेगाने वाढणाऱ्या माध्यम समूहात काम करण्याची संधी.
इच्छुक उमेदवारांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:
कार्यालय: आयेशा टॉवर, दर्यापूर, जि. अमरावती.
संपर्क: ९९७५५३२२९१/९०९६९४५६२९

## शेवटच्या कुस्तीत पुण्याच्या वैभव तांगडेची बाजी

**▸विदर्भ केसरी।**

वाघोली येथे ६८व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा भव्य शुभारंभ उत्साहात पार पडला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत या सोहळ्याचे उद्घाटन 'मातृशक्ती'च्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरविकास व परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्यासह विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



आज झालेल्या शेवटच्या कुस्ती स्पर्धेत गादी आखाड्यातून पुण्याचा वैभव तांगडे विजयी झाला, तर छत्रपती संभाजीनगरच्या अखिलेश पवारला पराभव पत्करावा लागला.

## विद्यार्थ्यानेच टाकला होता प्रश्नपत्रिकांवर डल्ला

### सांगोल्यात दहावीच्या पेपर चोरीचा छडा: अभ्यास न झाल्याने चोरल्याची कबुली

**▸विदर्भ केसरी।**

सांगोला येथील सांगोला विद्यामंदिर शाळेतून दोन दिवसांपूर्वी चोरीला गेलेल्या दहावीच्या भूगोलाच्या 50 प्रश्नपत्रिका शोधण्यात पोलिसांना अखेर यश आले असून, याप्रकरणी त्याच केंद्रावर परीक्षा देणाऱ्या एका विधी संघर्ष ग्रस्त अल्पवयीन विद्यार्थ्याचा धक्कादायक सहभाग उघड झाला आहे. विशेष म्हणजे, हे कृत्य करणारा विद्यार्थी स्वतः दहावीत शिकत असून आज भूगोलाचा पेपर दिल्यानंतर पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. दोन दिवसांपासून सुरू असलेल्या या शोधमोहिमेचा आज असा नाट्यमयरीत्या शेवट झाला असून, या घटनेमुळे शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

भूगोलाचा पुरेसा अभ्यास झाला नसल्यामुळे या विधी संघर्षग्रस्त अल्पवयीन विद्यार्थ्याने प्रश्नपत्रिका चोरी केल्याची कबुली पोलिसांच्या चौकशीत दिली आहे. आपल्या पालकांसमोर दिलेल्या जबाबात त्याने सांगितले की, चोरी करण्यापूर्वी त्याने केंद्रावरील स्ट्राँग रूमची पद्धतशीर पाहणी केली होती आणि त्यानंतर पहाटे दोनच्या सुमारास इलेक्ट्रिक बाईकवर इलेक्ट्रिक कटर घेऊन तो शाळेत पोहोचला. कटरच्या साहाय्याने कुलूप तोडून त्याने भूगोलाच्या प्रश्नपत्रिकांचे दोन गठ्ठे आणि तीन कोऱ्या उत्तरपत्रिका लंपास केल्या. घरी पोहोचल्यावर त्याने त्यातील एक गठ्ठा फोडून प्रश्नपत्रिकाही पाहिली होती, अशी धक्कादायक माहिती या तपासातून समोर आली आहे.




## लिंगायत समाजाच्या १७ उपजातींचा केंद्राच्या OBC यादीमध्ये समाविष्ट होणार

**▸विदर्भ केसरी। नवी दिल्ली :**

लिंगायत समाजाच्या १७ उपजाती केंद्राच्या ओबीसी यादीमध्ये समाविष्ट होणार असल्याची माहिती शिवा संघटनेचे अध्यक्ष मनोहर धोंडे यांनी बुधवारी (दि. १८) दिली. यासंबंधी त्यांची केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासोबत बैठक झाली.



बैठकीनंतर बोलताना ते म्हणाले की, 'आज केंद्रीय समाज कल्याण राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासोबत बैठक झाली. शिवा संघटनेमुळे लिंगायत समाजाच्या २५ जाती ओबीसीमध्ये आल्या आहेत. आता १७ उपजाती केंद्राच्या ओबीसी यादीत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याबाबतीत आजच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. तसेच राष्ट्रीय ओबीसी आयोगाच्या अध्यक्षांची भेट घेतली. लवकरच १७ उपजाती ओबीसीमध्ये समाविष्ट करण्यासाठी केंद्राला प्रस्ताव देणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले.

'यासाठीच्या तांत्रिक बाबींची माहिती राज्याकडून मागवली आहे. या १७ उपजाती महाराष्ट्रातील असून मराठवाड्यामध्ये जास्तीत जास्त आहेत, असे ते म्हणाले. या उपजाती ओबीसीमध्ये समाविष्ट झाल्यावर मोठा फायदा होणार आहे. आम्ही सुरुवातीपासून ओबीसीमध्ये जाण्यासाठी आग्रही आहोत असे ते म्हणाले.






दैनिक विदर्भ केसरी विदर्भाचा मानबिंदू
गुरुवार, १९ मार्च २०२६ | २

# भराईत आढळले मानवी शरीराचे तुकडे

## या घटनेवरून द्रुष्यम सिनेमाची अनेकांनी आठवण करून दिली की हा खुन दृष्यम स्टाईल

▸विदर्भ केसरी। संतोष काळे



**वाशिम** वाशिम-हिंगोली महामार्गावर सुरू असलेल्या चौपदरी करणाच्या कामात मंगळवारी रात्री एक अत्यंत धक्कादायक आणि थरारक प्रकार उघडकीस आला. रस्त्याच्या कामासाठी टाकण्यात आलेल्या मुरुमाच्या ढिगाऱ्यात मानवी शरीराचे अवयव आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ही घटना १७ मार्च रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास स्थानिक बाजार समिती ते डम्पिंग ग्राऊंड दरम्यान उघडकीस आली. याबाबत स्थानिक पोलीस यंत्रणामार्फत कामाची चौकशी केली असता दिनांक १८ मार्च रोजी याच जागेवर पुरून ठेवलेला म्रुतदेह आढळून आल्याने संपूर्ण शहरात चर्चेला उधाण आले.

मिळालेल्या माहितीनुसार, महामार्गाच्या कामासाठी कंत्राटदाराने बोराळा परिसरातून गौण खनिज (मुरुम) आणले होते. मंगळवारी रात्री या मुरुमाची मोजणी आणि पसरवण्याचे काम सुरू असताना, एका ढिगाऱ्यात कामगारांना मानवी शरीराचा पायाचा भाग दिसून आला. हा धक्कादायक प्रकार पाहताच परिसरात भीतीचे वातावरण पसरले आणि बघ्यांची मोठी गर्दी जमली. या घटनेची माहिती मिळताच वाशिम शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार आपल्या ताफ्यासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक तपासात सदर अवयव हे एका पुरुष जातीच्या व्यक्तीचे असल्याचे निष्पन्न झाले आहे. अंधाराचा फायदा घेत गुन्हेगारांनी मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी हा प्रकार केला असावा, असा संशय व्यक्त केला जात आहे. हा मानवी मृतदेह नेमका कोणाचा आहे ? संबंधित व्यक्तीची हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह मुरुमात गाडला होता का ? की बोराळा येथील उत्खनन क्षेत्रातून हे अवशेष मुरुमा सोबत आले आहेत ? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. पोलिसांना संशय आहे की, शरीराचे इतर भागही आजूबाजूच्या मुरुमाच्या ढिगाऱ्यात असू शकतात. त्यादृष्टीने पोलिसांनी 'सर्च ऑपरेशन' तीव्र केले असून ढिगारे उपसण्याचे काम सुरू आहे.

### लवकरच होणार उलगडा

■ "या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आम्ही सर्व बाजूंनी तपास करत आहोत. फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले असून, मृतदेहाची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. लवकरच या प्रकरणाचा उलगडा होईल." पोलीस प्रशासन वाशिम जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे द्वारा सांगण्यात आले

# चोरांच्या टोळीचा पर्दाफाश

▸विदर्भ केसरी। प्रतिनिधी

**राळेगाव** शेतशिवारात उच्छाद मांडून कृषीपंप चोरणारी टोळी वडकी पोलिसांनी मोठ्या शिताफीने जेरबंद केली. त्यांच्याकडून तब्बल १७ मोटारपंप व दुचाकी वाहन ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई वडकी पोलिसांनी बुधवारी (ता.१८) केली. मिलींद बाबाराव सातघरे, अमोल सुभाष शिरपुरकर, मंगेश सुभाष शिरपुरकर, प्रमोद सुरेश पोहणकर, महिंद्रा गोसावी उईके सर्व रा. वाढोणा बाजार ता. राळेगाव अशी आरोपींची नावे आहेत.

वाढोणा बाजार येथील शेतकरी बापूराव पांडुरंग डोमकावळे (५०) यांनी १३ मार्च रोजी मोटारपंप चोरीची फिर्यादी दिली होती. त्यावरुन गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला. गुप्त माहितीच्या आधारे पाच जणांना ताब्यात घेऊन त्यांना हिसका दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. बापूराव डोमकावळे, सुभाष पुरुषोत्तम मांडवकर रा. लाडकी, उमेश झाडे रा. वाढोणा बाजार, शंकर कुकडे रा. वाढोणा बाजार, योगेश कोल्हे रा. टाकळी, ससाने गुरुजी रा. लाडकी, शिवा माहुरे रा. वाढोणा बाजार व इतर शेतकऱ्यांच्या शेतातून मोटारपंप चोरी केल्याचे कबुल केले. या आरोपीनी कोणा-कोणाला मोटारपंप दिले, त्याचा शोध घेवून पोलिसांनी एकूण १७ पाण्याच्या मोटारी व एक दुचाकी (एमएच ३३ के ४३९९) असा एकूण १ लाख ५५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर कारवाई एसपी कुमार चिंता, अपर एसपी अशोक थोरात, सहायक पोलीस अधीक्षक रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनात वडकीचे ठाणेदार सुखदेव भोरकडे, दीपक मडकाम, दीपक वांड्रसवार, अमोल चौधरी, सचिन नेवारे, आकाश कुदुसे, निरंजन, अमीर किन्नाके, होमगार्ड प्रवीण चौधरी, वैभव चहारे यांनी पार पाडली.

# फळबागांचे अनुदान काढण्यासाठी कृषी विभाग ॲक्शन मोडवर

▸विदर्भ केसरी। मंगरूळपीर



तालुक्यातील महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना फळबाग लागवडीच्या गोगरी, खेर्डा खु, खेर्डा बु, चोरद, येडशी, भूर , पुर व शेलूबाजार या गावातील शेतकऱ्यांच्या फळबागांच्या प्रलंबित अनुदानाचे प्रकरण प्रसारमाध्यमात प्रचंड गाजत असतानाच तोंडावर मार्च महिन्याचे अवघे काही दिवस उरले असल्याने कृषी विभागातील सबंधित अधिकाऱ्यांची लगबग पहायला मिळत आहे. उन्हाचा प्रचंड पारा वाढला असून जीवाची लाही लाही होत असताना सुटीच्या दिवशीही कृषी कर्मचारी खेड्यावर जाऊन शेतकऱ्यांच्या भेटी घेत आहेत. चोरद गावातील सहा शेतकऱ्यांचे तीन वर्षाचे फळबागेतील कलमांचे व इतर साहित्याचे रुपये ५०२८५४ प्रलंबित आहेत. येडशी गावातील चार शेतकऱ्यांचे दोन वर्षाचे फळबागेतील कलमा व साहित्याचे रु .१३१४९९ प्रलंबित आहेत. गोगरी गावातील अकरा शेतकऱ्यांचे तीन वर्ष मिळून रु. १०४६६६३ प्रलंबित आहेत, ह्या सर्व प्रलंबित रकमा या महिन्याचे अखेरपर्यंत शेतकऱ्यांचे बँक खात्यात जमा करणे क्रमप्राप्त आहे. या महिन्यात ह्या प्रलंबित रकमा शेतकऱ्यांना मिळाल्या नाहीत तर त्या कधीच शेतकऱ्यांना मिळणार नाहीत याची जाणीव कृषी अधिकाऱ्यांना आहे. तीन वर्ष झोपेचे सोंग घेतलेले कृषी विभागाचे अधिकारी प्रकरण उजेडात आल्यावर सुटीचे दिवस न बघता पवन गतीने पळत असल्याचे दिसत आहे. ३१ मार्च अखेर सर्व प्रलंबित रकमा शेतकऱ्यांना देण्याचा कृषी विभागाचा आटोकाट प्रयत्न दिसत आहे. शेतकऱ्यांच्या भेटी घेणे, त्यांना भावनिक विनवणी करून कोऱ्या कागदावर स्वाक्षऱ्या घेणे, घाईघाईने कामांची मापे नोंदविणे, बिले तयार करण्याची धांदल सुरू असल्याची माहिती आहे. हे अधिकाऱ्यांच्या अनियमिततेचे प्रकरण उजेडात आल्याने आतातरी आपले अनुदान मिळणार यामुळे पीडित शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण आहे. व शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत झाल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील सर्वच शेतकऱ्यांचे या प्रकरणाकडे लक्ष लागलेले आहे, हे पाहणे महत्वाचे आहे की,शेतकऱ्यांना वेळेत अनुदान दिल्या जाते की त्यांच्या तोंडाला पाने पुसल्या जातात, अशीही शक्यता नाकारता येत नाही की, शेतकऱ्यांना भेटून घाईत आपले रेकॉर्ड पाहिजे तसे करून सर्व अनियमितता शेतकऱ्यांच्या माथी मारून आपण कागदोपत्री नामानिराळे , सुरक्षित होणे. अधिकाऱ्यांची दिसत असलेली लगबग आपली अनियमितता नियमात आणणे, खोटे दस्तावेज तयार करणे , पीडित शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून , स्वतःला प्रकरणात सुरक्षित करून आपली नोकरी वाचविणे यासाठीही ही लगबग असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

# दोषींवर तत्काळ कारवाई करा, अन्यथा मुख्यमंत्र्यांकडे धाव घेऊ!

## अकोला जिल्हा परिषद दिव्यांग शिक्षक बदली घोटाळा : आमदार हरिष पिंपळे यांचा प्रशासनाला गर्भित इशारा.

▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर



अकोला जिल्हा परिषदेत गाजत असलेल्या २६८ दिव्यांग शिक्षकांच्या बदल्यांमधील महाघोटाळ्याने आता राजकीय वळण घेतले आहे. या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही. जर तत्काळ कारवाई झाली नाही, तर थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करण्याचा गर्भित इशारा मूर्तिजापूर विधानसभेचे आमदार हरिष मारोती आप्पा पिंपळे यांनी दिला आहे. 'खाबुगिरी' आणि बोगस प्रमाणपत्रांचा बाजार आमदार पिंपळे यांनी या घोटाळ्याचे स्वरूप स्पष्ट करताना सांगितले की, जिल्हा परिषद प्रशासन आणि शिक्षण विभागाने संगनमत करून बोगस दिव्यांगांना बदली प्रक्रियेत लाभ मिळवून दिला आहे. जिल्हा शल्य चिकित्सकांकडून तपासणी करण्याचे शासनाचे स्पष्ट आदेश असतानाही, तालुका स्तरावरच 'छुपा अजेंडा' राबवून अपात्र शिक्षकांना पात्र ठरवण्यात आले.

घोटाळ्याचे धक्कादायक

कर्णबधीर प्रवर्ग ९९% शिक्षक बोगस असण्याची शक्यता.

अस्थिव्यंग व अल्पदृष्टी,१०% बोगसगिरीचा संशय.

संवर्ग २ पती-पत्नी एकत्रीकरण १३४ शिक्षकांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून पैशांच्या जोरावर अंतराचे खोटे दाखले मिळवले.

* विभक्त असल्याचे बनावट दावे: बदलीचा लाभ घेण्यासाठी अनेक शिक्षकांनी कागदोपत्री विभक्त असल्याचे दाखवून प्रशासनाची दिशाभूल केली आहे.

अधिकाऱ्यांची 'मिलीभगत' उघड करणार सामाजिक कार्यकर्ते गणेश कुरई यांच्या तक्रारीनंतर या प्रकरणाचे गांभीर्य समोर आले. यावर बोलताना आमदार पिंपळे म्हणाले, "ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सचिव तुकाराम मुंढे आणि विभागीय आयुक्तांना मी पत्र देऊन अहवाल मागवला होता. मात्र, जिल्हा परिषदेचे काही वरिष्ठ अधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी हे प्रकरण दडपण्यासाठी जिवाचा आटापिटा करत आहेत. ३ हजार रुपये द्या आणि खोटे प्रमाणपत्र घ्या, अशी 'स्वयंघोषित योजना' तिथे सुरू आहे."

■ खऱ्या व गरजू दिव्यांग बांधवांवर अकोला जिल्हा परिषद प्रशासन अन्याय करत आहे. बोगसगिरी करणाऱ्या शिक्षकांना आणि त्यांना साथ देणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुद्ध आम्ही उच्च न्यायालयात पुरावे सादर करू. खऱ्या दिव्यांगांना न्याय मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही."
> आमदार हरिष पिंपळे

### प्रशासकीय वर्तुळात खळबळ

■ या घोटाळ्याचे धागेदोरे थेट मंत्रालयापर्यंत पोहोचल्याने अकोला जिल्हा परिषद प्रशासनाचे धाबे दणाणले आहेत. बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांची जिल्हा शल्य चिकित्सकांकडून फेरतपासणी झाल्यास अनेक मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. आता आमदार पिंपळे यांच्या इशाऱ्यानंतर राज्य सरकार यावर काय पाऊल उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अग्रलेख

# खेला होबे!

प्रसारमाध्यमांत सर्वात गाजणाऱ्या आणि गरजणाऱ्या विरोधी गोटातल्या प्रमुख नेत्या म्हणजे ममता बॅनर्जी. गेल्या सलग तीन विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमताने पश्चिम बंगालची सत्ता अबाधित राखून त्यांनी आपल्या तृणमूल काँग्रेस या पक्षाची राज्यावर घट्ट पकड ठेवली आहे. गेल्या निवडणुकीत 'खेला होबे' (खेळ होईल) अशी घोषणा देत त्यांनी विजयाची हॅट्ट्रिक साधली होती. आता पश्चिम बंगाल विधानसभेची 23 एप्रिलला निवडणूक होत असून ममता बॅनर्जी आपला मार्ग निष्कंटक राखणार की भारतीय जनता पक्ष त्यांना आव्हान देणार, याचे उत्तर या निवडणुकीच्या निकालाने स्पष्ट होणार आहे. 1970 च्या दशकापर्यंत काँग्रेस आणि नंतर तीन दशके मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाची राजवट असलेल्या पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवाद्यांना जबरदस्त आव्हान दिले ते ममता बॅनर्जींनी. काँग्रेसमधून बाहेर पडून त्यांनी तृणमूल काँग्रेसची स्थापना केली. 2001 च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला 28 जागा मिळाल्या होत्या, तर ममतांनी 60 जागा जिंकून आपले अस्तित्व निर्माण केले होते. त्यानंतर त्यांची घोडदौड वेगाने सुरू झाली आणि दहा वर्षांतच म्हणजे 2011 च्या निवडणुकीत 294 पैकी 184 जागा जिंकत ममतांनी निर्विवाद सत्ता मिळविली. तेव्हा भाजपला खाते उघडता आले नव्हते. 2016 च्या निवडणुकीत ममतांनी 211 जागा जिंकून दोन तृतीयांश हुकमी बहुमत मिळवले, तेव्हा भाजपने तीन जागा जिंकत आपले अस्तित्व निर्माण केले. 2021 ची विधानसभा निवडणूक ममता आणि भाजप यांच्यातच झाली. 214 जागा जिंकून ममतांनी पकड भक्कम केली, तर तीन जागांवरून 77 जागांवर झेप घेत भाजपने प्रभाव निर्माण केला आणि एकेकाळी प्रमुख पक्ष असलेल्या काँग्रेस आणि मार्क्सवादी पक्षांना भोपळाही फोडता आला नाही. या दोन प्रमुख पक्षांचे अस्तित्व जणू नाहीसेच झाले. 2021 च्या निवडणुकीत मतमांच्या तृणमूल काँग्रेसला 48.2 टक्के मते मिळाली; पण भाजपनेही 37.97 टक्के मते खेचत ममतांपुढे आव्हान उभे केले. आता या निवडणुकीत भाजप आपली मते किती वाढविणार, किती जागा जिंकणार यावर सत्तापालट होणार का, याचे उत्तर मिळेल. लोकसभा निवडणुकीत भाजपचे 18 खासदार निवडून आले, हेही लक्षात घेतले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जबरदस्त करिश्मा अबाधित आहे. केंद्रासह अनेक राज्यांतील सत्ता, दिग्गज नेत्यांची मांदियाळी, जबरदस्त संघटना हे भाजपचे प्लस पॉईंट आहेत आणि पश्चिम बंगालमध्ये भाजपचे जाळे सर्वदूर तळागाळात पसरलेले आहे. प्रत्येक बूथवर भाजप कार्यकर्त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे आणि निवडणुकीसाठी जय्यत तयारी केली आहे.ममता बॅनर्जी या लोकप्रिय नेत्या आहेत आणि सदैव आक्रमक राहत आपण बंगालची अस्मिता आहोत, हा दावा त्यांनी सातत्याने अधोरेखित केला आहे. केंद्र सरकारच्या पश्चिम बंगालविषयक कोणत्याही निर्णयाला रस्त्यावर उतरून आव्हान देण्याची त्यांची स्टाईल आहे आणि सर्वसामान्य जनतेला त्याचे आकर्षण वाटत आले आहे. तृणमूलसाठी आयपॅक ही संस्था निवडणुकीच्या रणनीतीचे काम करते. या संस्थेवर हवालामार्फत पैसा पुरवला गेल्याच्या आरोपावरून 8 जानेवारीला ईडीने छापा घातला. लॅपटॉप, हार्डवेअर, फोल्डर आदी साहित्य जप्त केले तेव्हा ममता बॅनर्जी थेट घटनास्थळी गेल्या आणि त्यांनी ईडीने जप्त केलेले सारे साहित्य आपल्या ताब्यात घेतले. ईडीविरोधात पोलिसांत फिर्याद दिली. निवडणुकीच्या तोंडावर हे प्रकरण गाजत आहे. त्याचा कोणाला किती लाभ होणार, हे निकालातून स्पष्ट होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच पश्चिम बंगालमधील पायाभूत सुविधांसाठी 18,680 कोटींच्या प्रकल्पाची पायाभरणी केली. भाषणात त्यांनी ममतांच्या कारभाराचे वाभाडे काढले आणि पश्चिम बंगालमध्ये हिंदूंची संख्या इतराच्या तुलनेत घटत चालल्याचा गंभीर इशाराही दिला. मोदी यांनी निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे. त्यातून भाजपचा प्रचार अतिशय आक्रमक होईल, याचे संकेत मिळत आहेत. पश्चिम बंगाल हे संवेदनशील राज्य म्हटले जाते. बंगाली भाषिकांच्या प्रतिक्रिया तीव्र असतात. त्यामुळे बंगाली अस्मिता आणि राष्ट्रीय विचारधारा यांच्यातील संघर्ष या निवडणुकीत दिसून येण्याची शक्यता आहे. काहीही करून ममतांना राज्य टिकवणे आवश्यक आहे. ते हातून गेले, तर त्यांच्या कारकिर्दीची उलट गणती सुरू होण्याचा धोका आहे.




दैनिक विदर्भ केसरी RNI MAHMAR/2022/88796 हे वृत्तपत्र प्रकाशक अमोल नरेश कंटाळे यांच्याव्दारे दैनिक विदर्भ केसरी कार्यालय शमीम आझाद शाळा दर्यापूर. जि. अमरावती कार्यालय, येथून मालक अमोल नरेश कंटाळे यांच्या वतीने प्रकाशित केलेले असून संपादक अमोल कंटाळे यांनी संपादीत केलेले आहे. आणि मुद्रक साई दर्पण प्रकाशन यांनी सिव्हिल लाइन दर्यापूर ता. दर्यापूर जिल्हा अमरावती पिन 444803 येथे मुद्रीत केलेले आहे. (या वृत्तपत्रातील प्रकाशित झालेल्या जाहीरातीसंदर्भात त्या त्या कार्यालयाशी / संस्थेची व्यक्तीशः संपर्क साधुन खात्री करुन पुढील व्यवहार करावा. वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेल्या लेख, वृत्त किंवा इतर मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (काही वाद निर्माण झाल्यास दर्यापूर न्यायालया अंतर्गत)

Printed by-Amol Naresh kantale (printer name) and published by- Amol Naresh kantale (Owner name) and printed at-SAI DARPAN PRAKASHAN civil line, Daryapur Tq-Daryapur dist, Amravati Maharashtra 444803 (name & complete address of printing press)and published at-shamim Azad school Rajputpura, Daryapur, dist, Amravati, Maharashtara-444803 complete place of publication-Editor-Amol Naresh Kantale(Editor name ) tital code. MAHMAR51049 l, Email:-vidarbhkesari21@gmail.com Mob-9975532291,9096945629

## जागेच्या कारणावरून इसमाला मारहाण

**■ यवतमाळ : तात्पुरत्या वापरसाठी दिलेल्या जागेवर काहींनी टिनाचे शेड टाकले. यावरून मूळ जागामालकाने विचारणा केली असता त्यालाच मारहाण करण्यात आली. ही घटना राळेगाव येथे उजवणे दवाखान्याच्या बाजूला क्रांती चौकात १५ मार्चला घडली. या प्रकरणी क्षितीज श्रीकांत उजवणे (२७) रा. मातानगर राळेगाव याच्या फिर्यादीवरून पोलिसांनी दामोदर हिवरे (४५), मोहन हिवरे (४०), क्रिष्णा हिवरे (४३) रा. रावेरी यांच्यावर गुन्हा दाखल केला.**

### महत्त्वाचे



## 21 एप्रिल पासून बेमुदत संप- शासनाला नोटीस

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ,**

यवतमाळ : राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक तसेच नगरपरिषद कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याच्या निषेधार्थ राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या समन्वय समितीने 21 एप्रिलपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात 17 मार्च रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना नोटीस देण्यात आली.महाराष्ट्र विधानसभेत पेन्शनच्या मुद्द्यावर घोषणा होऊनही अद्याप ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही, अशी कर्मचाऱ्यांची भूमिका आहे. यापूर्वीही कर्मचाऱ्यांनी 6 मार्च, 20 मे, 9 जुलै, 11 नोव्हेंबर, 5 डिसेंबर तसेच 9 ते 11 डिसेंबरदरम्यान टप्प्याटप्प्याने आंदोलन केले होते. याशिवाय 12 फेब्रुवारी रोजीदेखील विविध स्वरूपात आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र, त्यानंतरही शासनाचा प्रतिसाद नकारात्मकच राहिल्याचा आरोप करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आता बेमुदत संपाचा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे प्रशासनावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यवतमाळ येथे निवेदन देताना नंदकुमार बुटे, मंगेश वैद्य, संदीप मोहाडे, महेश सोनोने, प्रफुल फुंडकर, राजेंद्र गावंडे, गौरव आगाशे, अजय गौरकर, श्याम माडमवार, गोपाल गायकवाड यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## महिला शेतकरी गटांना गावस्तरावर कृषी अवजारे बँक स्थापनेची संधी

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यात राबविण्यात येत असलेल्या नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत गावस्तरावर कृषी अवजारे बँक स्थापन करण्यासाठी महिला शेतकरी गटांना मोठी संधी उपलब्ध झाली आहे. यासाठी यवतमाळ उपविभगातील पात्र गटांनी 5 एप्रिलपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी जे.आर. राठोड यांनी केले आहे. या प्रकल्पांतर्गत 'एक गाव, एक कृषि अवजारे बँक' या तत्वानुसार प्रकल्प गावातील नोंदणीकृत महिला शेतकरी गटांमार्फत गावस्तरावरील कृषि अवजारे बँक स्थापन करुन भाडेतत्वावर यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी प्रकल्प गावातील उमेद व माविम पुरस्कृत महिला बचत गट तसेच महिला गाव संघ पात्र राहणार आहेत. कृषि यांत्रिकीकरणाला चालना देण्यासाठी गावस्तरावरील नोंदणीकृत महिला बचत गटांना एफपीओ-डिबीटीच्या https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/ या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. याबाबत अधिक माहितीसाठी एफपीओ-डिबीटी पोर्टलला भेट द्यावी. यवतमाळ उपविभगांतर्गत 126 गावांची नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत निवड झालेली आहे. यात यवतमाळ तालुक्यात 28, कळंब तालुक्यात 30, राळेगाव तालुक्यात 39 आणि घाटंजी तालुक्यात 29 अशा एकूण 126 गावांची निवड झाली असून गावस्तरावरील कृषि अवजारे बँक या घटकासाठी प्रकल्पाच्या एफपीओ-डिबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. या घटकासाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम दि. 5 एप्रिलपर्यंत असून एका गावातून एकापेक्षा जास्त गटांचे अर्ज प्राप्त झाल्यास, अर्जाची निवड प्रक्रिया ऑनलाईन लॉटरी पध्दतीने करण्यात येईल, असे आवाहन आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी जे.आर. राठोड यांनी केले आहे.

## यवतमाळ तालुक्यात कृषी अवजारे बँक स्थापनेसाठी 5 एप्रिलपर्यंत ऑनलाईन अर्ज करावे

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

: जागतिक बँकेच्या सहाय्याने राज्यात नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत यवतमाळ तालुक्यात गावस्तरावर कृषी अवजारे बँक स्थापन करण्यासाठी महिला शेतकरी गटांनी 5 एप्रिलपर्यंत ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी पी. एम. गवई यांनी केले आहे. या प्रकल्पांतर्गत 'एक गाव, एक कृषि अवजारे बँक' या तत्वानुसार प्रकल्प गावातील नोंदणीकृत महिला शेतकरी गटांमार्फत गावस्तरावरील कृषि अवजारे बँक स्थापन करुन भाडेतत्वावर यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी प्रकल्प गावातील उमेद व माविम पुरस्कृत महिला बचत गट तसेच महिला गाव संघ पात्र राहणार आहेत. कृषि यांत्रिकीकरणाला चालना देण्यासाठी गावस्तरावरील नोंदणीकृत महिला बचत गटांना एफपीओ-डिबीटीच्या https://dbt-ndksp.mahapocra.gov.in/ या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. याबाबत अधिक माहितीसाठी एफपीओ-डिबीटी पोर्टलला भेट द्यावी. यवतमाळ तालुका अंतर्गत 28 गावांची नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत निवड झालेली आहे. यात आसोला, पांढुर्णा, पिंपरी, वाई, आनंद नगर, हातोला जांभुळणी, टेंभुर्णी, कापरा (मेथड), किटा, टेकडी, लासीना, पिंपरी (आई), वाघपूर, चिंचबर्डी, पारवा, भारी, तळेगाव, वाकी, शिवनी बु, खानगाव, जामडोह, घोडदरा, चिंचघाट, वडनेर, रामवाकडी, धरमगाव, सायखेडा खु, गावे असे एकुण 28 गावांची निवड झाली असुन गावस्तरावरील कृषि अवजारे बँक या घटकासाठी प्रकल्पाच्या एफपीओ-डिबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

# अभी 'मे'...बाकी है!

## मार्च हिटचा तडाखा : शिरसगाव परिसरात संत्रा फळगळ



**▸विदर्भ केसरी। अक्षय गुर्जर:**

**शिरसगाव कसबा :** अति उष्णतेमुळे संत्रा पिकात फळगळतीची समस्या वाढत आहे.विशेषतः चांदुर बाजार तालुक्यातील शिरसगाव कसबा, पाळा,पांढरी व आसपासच्या अनेक गावांतील आंबिया बहारातील संत्रा फळांना याचा फटका बसल्याने संत्रा उत्पादक शेतकरी चिंतातुर झाले आहेत.ऐन मार्चमध्ये अचानक झालेल्या तापमानातील वाढीने झालेल्या फळगळीने संत्रा उत्पादकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. अजूनही एप्रिल, मे बाकी असूनही तेव्हा काय होईल? याची तर कल्पना न केलेली बरी. काही ठिकाणी तर झाडाचा बहारच गळाला,असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

तुरीच्या आकारापासून ते चण्याच्या आकारापर्यंत असलेले फळे गळत आहे. ज्या प्रमाणात संत्रा बागांवर फुलधारणा झाली;त्या तुलनेत झाडांवर फळे नाहीत असे अनेक शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.विदर्भात मे महिन्यात ४५ ते ४६ अंश सेल्सिअस पर्यंत तापमानात वाढ होते.मात्र मार्च महिन्यातच पारा ४० अंशाच्या पुढे गेला असून हे तापमान बागांना सहन होण्यापलीकडे ठरले,परिणामी लहान आकाराच्या फळांची गळ होत आहे.

तज्ज्ञांच्या मते,संत्रा पीक वार्षिक असल्याने प्रति झाड तीनशे ते पाचशे रुपये खर्च होतो.त्यात महागडी औषधें,कीटकनाशके,खते,मशागतीचा समावेश आहे.डिसेंबर ते आजवर प्रति शेतकरी पाच ते सहा फवारण्या,खताचा सुरवातीचा बेसल डोस,वखरणी,मशागती,झाडांची सल काढणे व कटिंग आणि अन्य असा झालेला लाखोंचा खर्च आणि अजून पीक निघायला सहा महिने शिल्लक असताना येणारे आसमानी संकटे व पुढे होणाऱ्या खर्चाचा प्रश्न आता शेतकऱ्यांना पडू लागला आहे.

### अन यंदा तापमानाने फळगळ;दुहेरी संकट

**■ बऱ्याच भागांत आंबिया बहार फुटल्याने आनंदाचे वातावरण होते. त्या हिशेबाने शेतकऱ्याने फवारणी,मशागती,खते असा बागेवर खर्चही केला.गळ पाहता उत्पादन घटण्याची भीती शेतकऱ्यांना भेडसावत आहे. मागील पाच वर्षांपासून अन गेल्या वर्षीही सततच्या पावसाने संत्रा उत्पादकांचे कंबरडे मोडले अन यंदाही जर उत्पन्न झाले नाही तर संत्रा उत्पादक शेतकऱ्यांवर असलेला कर्जाचा डोंगर कसा फिटेल, असा प्रश्न आता शेतकऱ्यांना पडू लागला आहे.**

### पंचनामे,उपाययोजना करण्याची गरज

**■ अतिउष्णतेमुळे आंबिया बहरातील संत्रा फळगळती होत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे.त्यामुळे प्रशासनाने बागांची पाहणी करून नुकसानग्रस्त बागांचे पंचनामे करून आर्थिक मदत द्यावी.भविष्यातील वाढते तापमान,वाढती महागाई,संत्रा निर्यात व प्रकल्प यावर शासनाने लक्ष देऊन उपाययोजना करावी,अशी मागणी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.**



**गुढीपाडवा निमित्त यवतमाळातील सोशल मीडिया एन्लफुएंसर, मॉडेल भक्ती दुधे हिने केलेली मराठमोळी वेशभूषा.**

## अनसिंगमध्ये 'निर्भया' पथक फक्त नावापुरतेच?

**▸विदर्भ केसरी।अनसिंग**

महिला, युवती आणि शालेय विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी अत्यंत गांभीर्याने स्थापन करण्यात आलेले 'निर्भया पथक' अनसिंग परिसरात केवळ नावापुरतेच उरले आहे की काय, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. बस स्थानक परिसर, शा ळा आणि ऑटो पॉईंट यांसारख्या ग र्दीच्या ठिकाणी मुलींची छेडछाड (चिडी-मारी) वाढत असताना, हे पथक मा त्र कर्तव्याऐवजी स्वतःच्या खासगी कामात व्यस्त असल्याचे विदारक चित्र पाहायला मिळत आहे.

अनसिंग बस स्थानक हा परिसरातील महत्त्वाचा केंद्रबिंदू आहे. येथून शेकडो विद्यार्थिनी शाळा-म हाविद्यालयासाठी ये-जा करतात. मा त्र, गेल्या काही दिवसांपासून बस स्थानक परिसर आणि ऑटो पॉईंटवर




टवाळखोरांकडून मुलींची छेड काढण्याचे प्रमाण वाढले आहे. नियमानुसार, अशा ठिकाणी निर्भया पथकाचे सतत पेट्रोलिंग असणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्षात शाळा सुटण्याच्या वेळी किंवा गर्दीच्या वेळी हे पथक कुठेही दिसून येत नाही. मिळालेल्या माहितीनुसार, निर्भया पथकासाठी दिलेले शासकीय वाहन पेट्रोलिंगसाठी वापरण्याऐवजी कर्मचारी स्वतःच्या वैयक्तिक कामासाठी वापरत असल्याच्या तक्रारी येत आहेत. ज्या वाहनाने गुन्हेगारांवर वचक बसवणे अपेक्षित आहे, ते वाहन शाळांच्या परिसराऐवजी इतरत्र फिरताना दिसत असल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरात कुठेही अनुचित प्रकार घडल्यास किंवा छेडछाडीची घटना घडल्यास तत्काळ संपर्क साधण्यासाठी निर्भया पथकाचे संपर्क क्रमांक दिलेले असतात. मात्र, त्रस्त नागरिक किंवा विद्यार्थिनींनी फोन लावल्यास कर्मचारी फोन उचलण्याचे साधे सौजन्यही दाखवत नाहीत. कर्तव्यात कसूर करणाऱ्या या कर्मचाऱ्यांमुळे पोलिसांची प्रतिमा मलिन होत असून, गुन्हेगारांचे धाडस मात्र वाढत चालले आहे. महिलांच्या सुरक्षेचा विषय असतानाही स्थानिक प्रशासन आणि संबंधित कर्मचारी याकडे डोळेझाक करत आहेत. 'निर्भया'च्या नावाने मिळणाऱ्या सुविधांचा गैरवापर थांबवून, दोषी कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी आणि तातडीने पेट्रोलिंग सुरू करावी, अशी मागणी अनसिंग येथील पालकांनी व नागरिकांनी केली आहे. आता या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक किंवा वरिष्ठ अधिकारी काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जलजीवन मिशनच्या कामाला वेग

## पंचायत समितीच्या डीप्टी माकोळे मॅडम यांचे विशेष लक्ष

**▸विदर्भ केसरी। कुही (प्रतिनिधी - राजहंस शेंडे)**

कुही तालुक्यातील कूजबा गावात जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कामाला सध्या चांगली गती मिळाली आहे. गावकऱ्यांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी घरपोच उपलब्ध व्हावे या उद्देशाने उभारण्यात येणाऱ्या पाण्याच्या टाकीचे तसेच पाइपलाईन टाकण्याचे काम प्रगतीपथावर असून संबंधित विभागाकडून कामावर नियमित देखरेख ठेवण्यात येत आहे.

या महत्त्वपूर्ण कामाकडे कुही पंचायत समितीच्या डीप्टी माकोळे मॅडम यांनी विशेष लक्ष वेधले असून कामाची गुणवत्ता व गती कायम राहावी



यासाठी त्या सातत्याने आढावा घेत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनामुळे काम अधिक नियोजनबद्ध पद्धतीने पुढे सरकत असल्याची माहिती मिळत आहे.

दरम्यान, काही व्यक्तींमार्फत चुकीच्या प्रतिक्रिया देऊन कामाबाबत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न होत असला तरी प्रशासन आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे कामाची गती कायम ठेवण्यात आली आहे. गावातील नागरिकांना लवकरच घराघरात नळाद्वारे पाणीपुरवठा होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

### गावविकासाला नवी चालना मिळणार

**■ जलजीवन मिशनच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न असून कूजबा गावातील ही योजना पूर्ण झाल्यानंतर गावाच्या विकासाला नवी चालना मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.**

## डीपी स्थलांतराचा मार्ग मोकळा

**▸विदर्भ केसरी। नांदगाव खंडेश्वर**

प्रभाग क्रमांक ४ मधील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून अविनाश सदाशिवराव ब्राम्हणवाडे (स्वीकृत नगरसेवक) यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. संबंधित परिसरातील शंकर बाविस्थळे यांच्या घरासमोरील धोकादायक डीपी (डिस्ट्रिब्युशन पॉईंट) स्थलांतर करण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक पाऊल उचलले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अनेक वर्षांपासून घरांच्या अगदी जवळ असलेल्या या डीपीमुळे नागरिकांना सतत अपघाताचा धोका निर्माण झाला होता. तसेच घर बांधकाम, दैनंदिन हालचाली आणि परिसरातील सुरक्षिततेच्या दृष्टीनेही मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधत अविनाश सदाशिवराव ब्राम्हणवाडे यांनी दिनांक ०४/०३/२०२६ रोजी अधिकृत पत्राद्वारे महाराष्ट्र राज्य वीज वितरण



कंपनीकडे मागणी नोंदवली होती.

या पाठपुराव्याची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांनी याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले असून डीपी लवकरात लवकर स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. याबाबत बोलताना अविनाश सदाशिवराव ब्राम्हणवाडे म्हणाले, "नागरिकांच्या सुरक्षेसाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. अशा प्रकारच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी मी कायम तत्पर राहणार आहे." स्थानिक नागरिकांनीही नगरसेवकांच्या या प्रयत्नांचे स्वागत करत प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# मराठी शाळा वाचविण्यासाठी एल्गार मोर्चा

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

यवतमाळ राज्य सरकारने पटसंख्येच्या कारणावरुन हजारो मराठी शाळा बंद करण्याचा घाट घातला आहे त्याविरोधात ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनने राज्यव्यापी एल्गार पुकारला आहे.त्याअनुषंगाने आज 17 मार्च 2026 रोजी श्रमशक्ती भवन येथुन प्रचंड एल्गार मोर्चा राज्याध्यक्ष वैभव चोपकर,राज्यसचिव प्रतिक्षा ढोके,जिल्हाध्यक्ष अथर्व निवडिंग,शहराध्यक्ष अयान शाह यांचे नेत्रुत्वात प्रचंड मोर्चा काढण्यात आला.




राज्यातील कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा.२) पटाच्या आधारावर शिक्षकांची संख्या ठरविणारे धोरण रद्द करण्यात यावे. ३) दत्तक शाळा योजनेअंतर्गत शाळांचे खाजगीकरण करण्याची तयारी सुरू असून दत्तक शाळा योजना रद्द करून शासनानेच शाळांची जबाबदारी घ्यावी.४) सर्व शिक्षण संस्थांमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदभरती तातडीने घेण्यात यावी.५) शिक्षकांना अध्यापना व्यतिरिक्त इतर कोणतेही कामामध्ये गुंतवू नये. ६) संचमान्यता शासन निर्णय दि. १५ मार्च २०२४ तसेच कमी पटसंख्येच्या नावाखाली शाळा बंद (समायोजित) करण्याचे धोरण रद्द करून बालकांच्या शिक्षणाची हेळसांड थांबवावी. ७) शिक्षकांना टीईटी परीक्षा अनिवार्य केल्याचे निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावे. ८) सार्वत्रिक शिक्षण हक्क (RTE) कायद्यान्वये शाळांमध्ये भौतिक व शैक्षणिक सुविधा (प्रयोगशाळा, ग्रंथालय, खेळाचे साहित्य, प्रशस्त हवेशीर वर्गखोल्या, शौचालय, कम्प्युटर लॅब, इंटरनेटची सुविधा इत्यादी.) उपलब्ध करण्यात यावे.९) शाळांना गरजेनुसार आवश्यक निधी देण्यात यावा. १०) शालेय पोषण आहारामध्ये सुधारणा करण्यात यावी व गुणवत्तापूर्ण जेवन विद्यार्थ्यांना देण्यात यावे.११) शिक्षणावर GDP च्या ६% खर्च झालाच पाहिजे.१२) हिंदी विषय शाळेतील विद्यार्थ्यांवर लादू नये. नरेंद्र जाधव समिती रद्द करावी. १३) केरळ राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्णपणे मोफत करण्यात यावे.या लक्षवेधी मोर्चात बहुसंख्येने पालकांनी व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.याप्रसंगी भाकपचे जिल्हासचिव अनिल घाटे,आयटकचे जिल्हाध्यक्ष विजय ठाकरे, दिवाकर नागपुरे, ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशनचे राज्याध्यक्ष, वैभव चोपकर , राज्य सचिव,प्रतीक्षा ढोके,अखिल भारतिय नौजवान सभेचे राज्याध्यक्ष, सागर दुर्योधन यांनी aisf च्या मोर्चाला भरीव पाठींबा दिला.यशस्वीतेसाठी कॉ. अथर्व निवडिंग(राज्य कौन्सिल सदस्य),अयान शाह(जिल्हा समन्वयक),अभिजित नगराळे,रोशनी कांबळे, पियुष सोनुले,अनुष्का आत्राम,भुवनेश्वरी चामाटे,प्रेम ठेंगणे,कृष्णा यनगंदेवार,भुषण गणविर , संगीता गाडेकर,गुलाब उमरतकर,ईश्वर दरवरे, विठ्ठल मडावी या सह पालक विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# 10 गावातील तांडा वस्तीत उभारणार भव्य वाचनालये

## राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्याने 2.5 कोटी रुपयांचा निधी मंजूर

**▸विदर्भ केसरी। विजय निखाते**

**पुसद :** पुसद मतदारसंघातील तांड्यांच्या शैक्षणिक विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या पाठपुराव्यामुळे 10 गावातील तांडा वस्तीमध्ये आधुनिक वाचनालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमासाठी एकूण 2 कोटी 50 लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या योजनेअंतर्गत प्रत्येक वाचनालयाच्या बांधकामासाठी 25 लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला असून, त्यामुळे पुसद मतदारसंघातील काकडदाती, बन्सी, फुलवाडी, मोहा. ई, वडगाव, हुडी बु., तसेच महागाव



तालुक्यातील कोणदरी ई, तुळशी नगर या 10 गावातील तांडा वस्तीमध्ये लवकरच भव्य वाचनालयांची उभारणी होणार आहे. प्रशासकीय मंजुरीची प्रक्रिया पूर्ण होताच या कामांना सुरुवात होणार असल्याची माहिती मिळत आहे.

पुसद मतदारसंघ हा बंजारा समाज बहुल भाग असून येथे या समाजाची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. बंजारा समाजाचे नेतृत्व मागील सुमारे 70 वर्षांपासून नाईक परिवार करत आला आहे. समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळावे, यासाठी राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी विशेष पुढाकार घेत हा निधी मंजूर करून घेतला आहे. बंजारा समाजातील अनेक कुटुंबांची आर्थिक परिस्थिती मर्यादित असल्याने स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांमध्ये जाऊन शिक्षण घेणे अनेकदा शक्य होत नाही. ही अडचण लक्षात घेऊन गावपातळीवरच आभ्यासासाठी योग्य वातावरण उपलब्ध व्हावे, या उद्देशाने वाचनालयांची उभारणी करण्यात येत आहे.

या वाचनालयांमुळे परिसरातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होणार असून, स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी योग्य वातावरण निर्माण होणार आहे. परिणामी विद्यार्थ्यांना आपल्या गावात राहूनच मोठी स्वप्ने पूर्ण करण्याची संधी मिळणार आहे. दरम्यान, बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी घेतलेल्या या पुढाकाराबद्दल समाजामध्ये राज्यमंत्री इंद्रनील नाईक व नाईक परिवाराबद्दल कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यात येत आहे. आगामी काळात या वाचनालयांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> **■ तांड्यांच्या शैक्षणिक व भौतिक विकासासाठी नाईक परिवार कटीबद्ध असून येत्या काळात पुसद मतदार संघातील सर्व गावात वाचनालय विकसित करण्याचे स्वप्न आहे..... राज्यमंत्री इंद्रनील नाईक.**

# हनुमान जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**

शहरातील आखाडा चौक येथील श्री हनुमान मंदिरात यंदाचा श्री हनुमान जन्मोत्सव मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात साजरा केला जाणार असून, दि. 29 मार्च ते 2 एप्रिल 2026 या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. पाच दिवस चालणाऱ्या या उत्सवात कथा, अभिषेक, आरती, संगीतमय कार्यक्रम आणि महाप्रसादाचा लाभ भाविकांना घेता येणार आहे.

उत्सवाचे उद्घाटन दि. 29 मार्च रोजी सायंकाळी 6.30 वाजता परमपूज्य महंत अंबिका माता भारतीय काकूजी (भोपापूर, वाशी) यांच्या शुभहस्ते होणार आहे. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ॲड. प्रियदर्शनी उईके (नगराध्यक्ष), सुभाष भाऊ राय (माजी नगराध्यक्ष), विजय राय (नगरसेवक), मनिषा ताई भावे (नगरसेविका), श्याम सुरज मलजी भन्साली व सुशील शंकरलालजी कोठारी (उद्योजक) यांची उपस्थिती लाभणार आहे.

श्री हनुमान भक्ती चरित्र कथा दि. 29 मार्च ते 2 एप्रिल दरम्यान दररोज सायंकाळी 6.30 ते रात्री 10 वाजेपर्यंत पूज्य श्री क्षितिजजी महाराज, शारदा पीठ, द्वारका (गुजरात) यांच्या वाणीतील 'श्री हनुमान भक्ती चरित्र कथा' रंगणार आहे. या माध्यमातून भाविकांना आध्यात्मिक ज्ञानाचा लाभ मिळणार असून, भक्तीसाठी ही सुवर्णसंधी ठरणार आहे.

2 एप्रिल – मुख्य जन्मोत्सव दिन कार्यक्रम पहाटे 4.00 वा. – श्री हनुमानजींचा अभिषेक सकाळी 5.50 वा. – रघुघोष ध्वज पूजन सकाळी 6.00 वा. – जन्मोत्सव व महाआरती सकाळी 8.00 वा. – काला प्रसाद वितरण सकाळी 8.30 वा. – संगीतमय सुंदरकांड (श्री रामायण मंडळ, यवतमाळ) दुपारी 12.00 ते 3.00 – महाप्रसाद रात्री 10.00 वा. – कथा विराम, महाआरती व प्रसाद वितरण या पवित्र सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्री हनुमंताचे आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन श्री हनुमान मंदिर समिती, आखाडा चौक, यवतमाळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. आयोजनात कार्यकर्त्यांची धडपड उत्सवाच्या यशस्वीतेसाठी हनुमान भक्त मंडळाचे अध्यक्ष ईश्वर राय, उपाध्यक्ष वासुदेव बाविस्कर, सचिव गोविद यादव, कोषाध्यक्ष नंदकुमार बदनोरे यांच्यासह सुभाष यादव, विलास देशपांडे, दीपक ठाकूर, जगदीश मुराई, पंकज लालवाणी, सुनील यादव, सतीश यादव, संजय मुराई, रितेश राय, सचिन देशमुख, रमेश जयस्वाल, विजू देवीकर, अभिजीत चित्रे, राजू शर्मा, अशोक सिंघानिया, सोनू यादव, सचिन मुराई, प्रमोद राय, बल्लू यादव, शुभम यादव, सागर कुलरवार, शुभम पलोड, शुभम ग्वाल, लखन चौधरी, रोशन यादव, यश कनोजिया, तन्मय यादव, गौरव यादव, सुजल यादव, मयंक अहिर, बंटी मुराई, पार्थ चौधरी, संदीप पंड्या, रोहन गोंड, विवेक मुराई, संतोष जयस्वाल आदींसह असंख्य कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

## शेतात साठविली रेती, गुन्हा दाखल

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ :**

अवैधरीत्या शेतात ६०० ब्रास रेती साठवून ठेवणाऱ्या व्यक्तीविरूद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला. नाजीर मोहम्मद साहब (७०) रा.यवतमाळ याने डोर्ली शिवारातील शेतात ६०० ब्रास रेती चोरी करून साठवून ठेवली होती. नंतर ती रेती इतरत्र हलविताना महसूल विभागाच्या पथकाच्या निदर्शनास आले. त्यावरून मोहा येथील ग्राम महसूल अधिकारी अमित सीताराम चौधरी यांनी ही रेती जप्त केली व यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविली. त्यावरून नाजीर मोहम्मद साहब याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे

### महत्त्वाचे

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीवर कामठी तालुका अध्यक्षपदी आनंद मेश्राम यांची नियुक्ती

**▸विदर्भ केसरी। सतीश भालेराव नागपूर:-**



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा गट) यांच्या तर्फे ग्रामीण नागपूरचे अध्यक्ष राजाभाऊ टाकसाळे यांनी कामठी तालुका अध्यक्षपदी आनंद मेश्राम यांची नुकतीच निवड केली असून त्यांच्यावर जबाबदारी सोपविली की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा आपल्याला वाढवायचा आहे. पक्ष मजबूत करण्यासाठी सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी आनंद मेश्राम यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. सामाजिक कार्यकर्ते व युट्युब पत्रकार आनंद मेश्राम यांनी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, राजू जैन, राजाभाऊ टाकसाळे आणि नौशाद सिद्दीकी यांची दिलगिरी बाळगून मी सर्वांचे मनपूर्वक आभार मानतो. तसेच उच्चस्तरावरून मेश्राम यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

## हिवरा कोरडे येथे 'श्रीमद् भागवत कथा' सोहळ्याची भक्तिमय वातावरणात सांगता.

**▸विदर्भ केसरी। मूर्तिजापूर प्रतिनिधी.**



तालुक्यातील हिवरा कोरडे येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम संकीर्तन सप्ताह व संगीतमय श्रीमद् भागवत कथा सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. गुरुवर्य प्रज्ञाचक्षू ह.भ.प. वैकुंठवासी बापूराव महाराज यांच्या आशीर्वादाने आणि ह.भ.प. गुरुवर्य तुकाराम महाराज सखारामपुरकर व पद्मभूषण डॉ. विजय भटकर यांच्या प्रेरणेने आयोजित या सोहळ्याची सांगता १५ मार्च रोजी काल्याच्या कीर्तनाने करण्यात आली. ९ मार्चपासून सुरू झालेल्या या उत्सवात ह.भ.प. तुळशीदास महाराज धर्माळकर भागवताचार्य यांनी आपल्या मधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथेचे रसाळ निरूपण केले. सात दिवस चाललेल्या या श्रवणभक्तीचा लाभ पंचक्रोशीतील शेकडो भाविकांनी घेतला. या सोहळ्याचे औचित्य साधून उन्नत भारत अभियानांतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. स्व. आबासाहेब कोरडे प्रतिष्ठानच्या वतीने राजेंद्र कोरडे यांनी ह.भ.प. विवेक वसंतराव कांबे, ज्येष्ठ समाजसेवक प्रा. मुकेश सरदार, पत्रकार समाधान इंगळे आणि सेवानिवृत्त मुख्याध्यापक दिगंबर भुगूल यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन यथोचित सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शेखर बुरघाटे यांनी केले. लोकनेते स्व. नानासाहेब सपकाळ यांच्या जन्मशताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त दमानी नेत्र रुग्णालय अकोला व श्री मारुती देवस्थान ट्रस्ट, हिवरा कोरडे यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये परिसरातील १५० नागरिकांनी तपासणी केली, तर ५० रुग्णांची निवड मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी करण्यात आली. या रुग्णांवर दमानी रुग्णालय येथे मोफत उपचार केले जाणार आहेत. सप्ताहाच्या सांगतादिनी स्थानिक सांप्रदायिक हरिपाठ मंडळाच्या वतीने गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. काल्याच्या कीर्तनानंतर उपस्थित सर्व भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या सोहळ्याला नागपूर येथील राजेंद्र कोरडे सीमाताई कोरडे यांची विशेष उपस्थिती होती. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी सागर कोरडे, ज्ञानेश्वर कोरडे, हरिहर कोरडे, मंगेश चिंचे, चरणदास गावंडे, गजानन कोरडे यांच्यासह ग्रामपंचायत हिवरा कोरडे, श्री साईनाथ शिक्षण संस्था व मातोश्री सुशीलाबाई देशमुख विद्यालयाचे पदाधिकारी आणि गावकरी मंडळींनी मोलाचे सहकार्य केले.

# रस्त्यासाठी नागरिक रस्त्यावर!

## हाता ते कारंजा रमजानपुर रस्त्याची दुरवस्था; संतप्त नागरिकांकडून रस्ता रोको

**▸विदर्भ केसरी। राजकुमार चिंचोळकर**

**बाळापूर : तालुक्यातील हाता ते कारंजा रमजानपुर रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरण करणे बाबतीत हाता येथील नागरिकांनी दिनांक 18 मार्च रोजी रस्ता रोको आंदोलन केले. तर लेखी आश्वासन देऊन रास्त रोको आंदोलन मागे घेण्यात आले.**



हाता ते कारंजा रमजानपुर रस्ता जवळपास दोन किलोमीटर पर्यंत अर्धवट केला असुन केंद्रीय रस्ते महामार्ग अंतर्गत मंजूर असताना गावापासून झिरो वरुन किलोमीटरहून असणाऱ्या व मा खासदार ह्यांचे लोकसभा क्षेत्रात येत असल्याने हाता ते कारंजा रोड राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अकोला जिल्ह्याचे तात्कालीन पालकमंत्री असताना अकोला जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उठाव करण्यात आला होता. असे असताना हाता कारंजा रमजान पुर रस्त्याचे अर्धवट काम करुन गेली दोन वर्षांपासून रस्ताची पूर्णपणे दुरवस्था झाली आहे. गावातील शेकडो विद्यार्थी .व्यापारी तसेच नागरिकांना प्रवास करीत असताना खुप त्रासदायक झाले असून बरेच वेळा किरकोळ अपघात झाले असून कित्येक जण गंभीर जखमी झाल्याच्या घटना तसेच हात पाय व मणक्याचे आजाराने ग्रस्त होऊन त्रास सहन करावा लागतो रस्त्याची दयनीय अवस्था आहे म्हणून परिवहन महामंडळाच्या बसेस सुध्दा वेळी अवेळी बंद करण्यात येतात परिणामी विदयार्थी वर्गा चे शैक्षणिक नुकसान होत आहे. रस्ता म्हणजे प्रगती चे लक्षण संबोधले जाते तर गावातील नागरिकांनी संबंधित विभागाला वेळोवेळी तक्रार वा निवेदन सादर केले मात्र शासन प्रशासना कडून कामाबाबत दुर्लक्षीत पणा केला आहे.

परिणामी शासन व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी हाता फाटा येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. त्यावेळी संजय बावणे माजी जिल्हा परिषद सदस्य .किशोर कुचके सरपंच पती. श्याम मनसुटे. विजय धर्माळे शिवसेना नेते. गजानन सुलताने .भिमकिरण दामोदर. रवी क्षिरसागर.विजय दामोदर. गजानन देऊळकर गजानन नंदाने व बहुसंख्येने नागरिक उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम उपविभाग दोन अकोला चे कनिष्ठ अभियंता पलाश भोयर आंदोलन स्थळी उपस्थित होवून रोडचे कामा बाबत वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन रोडचे कामाबाबत उपाय योजना करणेबाबत पत्र दिल्यानंतर रस्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले.

रस्ता रोको आंदोलन दरम्यान उरळ पोलीस स्टेशन चे पोलिस उपनिरीक्षक कायदे . भोजने मेजर व लेडीज पोलीस कर्मचारी यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## रिसोडमध्ये गॅससाठी नागरिकांचे हाल

### ;एजन्सीबाहेर कडाक्याच्या उन्हात लांबच लांब रांगा : ऑनलाइन बुकिंग यंत्रणा ठप्प;

**▸विदर्भ केसरी। प्रदिप खंडारे**




**रिसोड :** रिसोड शहरात गेल्या काही दिवसांपासून घरगुती गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवत असून,त्यातच ऑनलाइन बुकिंगची सुविधा तांत्रिक कारणांमुळे विस्कळीत झाली आहे. परिणामी,नवीन सिलिंडर मिळवण्यासाठी नागरिकांना थेट गॅस एजन्सीच्या कार्यालया समोर रांगा लावाव्या लागत आहेत.मार्च महिन्याच्या तापत्या उन्हात तासन्तास उभे राहावे लागत असल्याने गृहिणींसह ज्येष्ठ नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत.

शासनाने गॅस बुकिंगसाठी ऑनलाइन सुविधा सक्तीची केली असली,तरी रिसोड शहरातील संबंधित गॅस एजन्सीची यंत्रणा सध्या संथ गतीने चालत आहे.अनेक ग्राहकांना मोबाइलवरून गॅस बुक करताना अडचणी येत आहेत.'सर्व्हर डाऊन' असल्याचे कारण सांगत एजन्सी कडून थेट कार्यालयात येऊन नोंदणी करण्यास सांगितले जात आहे.त्यामुळे घरबसल्या होणारे काम आता कार्यालयाच्या चकरा मारून करावे लागत आहे. सध्या उन्हाचा पारा ३८ अंशांच्या पार गेला आहे.

अशा परिस्थितीत सकाळी ८ वाजेपासूनच गॅस एजन्सी बाहेर रांगा लागत आहेत. यामध्ये महिलांची संख्या मोठी असून,लहान मुलांना सोबत घेऊन त्या उन्हात उभ्या असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे."दोन-दोन तास उन्हात उभे राहूनही नंबर येईल की नाही,याची खात्री नसते," प्रशासनाने याकडे लक्ष देऊन ऑनलाइन प्रक्रिया सुरळीत करावी आणि नागरिकांना घरपोच सिलिंडर मिळतील याची व्यवस्था करावी,अशी मागणी जोर धरत आहे.जर ही समस्या लवकर सुटली नाही, तर आंदोलनाचा पवित्रा घेण्याचा इशारा संतप्त नागरिकांनी दिला आहे.

## किन्ही येथे हवामान अनुकूल तंत्रज्ञान प्रशिक्षण संपन्न



**▸विदर्भ केसरी। राजहंस शेंडे,**

दीपस्तंभ ऑरगॅनिक फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या किन्ही येथील स्वनिर्मित जैविक निविष्ठा संसाधन केंद्रात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोखरा) टप्पा 2.0 अंतर्गत "कृषी ताई" यांच्या माध्यमातून हवामान अनुकूल तंत्रज्ञान विषयक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन तालुका कृषी अधिकारी कार्यालय, कुही यांच्या वतीने करण्यात आले. यावेळी तालुका कृषी अधिकारी श्री राजेश जारोंडे यांनी बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर आधुनिक व शाश्वत शेती तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले. दीपस्तंभ ऑरगॅनिक फार्मर प्रोड्युसर कंपनीचे संचालक श्री चिंधू आत्माराम ठवकर यांनी जैविक शेती व स्वनिर्मित जैविक निविष्ठांच्या वापराबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या प्रसंगी तंत्रज्ञान समन्वय अधिकारी (पोखरा) अमोल बांगडकर, श्री शिव टेके (पाणी फाउंडेशन), मंडळ कृषी अधिकारी श्री मंगेश भुसारी, मंडळ कृषी अधिकारी कुही श्री सुरज शेंडे तसेच बीटीएम आत्मा कुही श्री सचिन ताकसांडे उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाला परिसरातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या अनैतिक व्यवसायावर बेलतरोडी पोलिसांची कारवाई

**▸विदर्भ केसरी। सतीश भालेराव**




**नागपूर:-** पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीतील मनीषनगर परिसरात" स्पा सेंटरच्या नावाखाली अनैतिक देहव्यापार" सुरू असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्यानंतर दिनांक 17/03/2026 रोजी सायंकाळी सुमारे 17.30 वा. "7-C Wellness Spa" येथे पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. सदर कारवाईदरम्यान बोगस ग्राहकाच्या माध्यमातून खात्री करून तात्काळ छापा टाकण्यात आला असता, स्पा सेंटरमध्ये अनैतिक व्यवसाय सुरू असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी आरोपी सोनम सौरभ अडिगने (वय 28 वर्षे, राहणार प्रधानमंत्री आवास योजना पोलीस ठाणे वाटोळा,नागपूर) हिच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्राथमिक तपासात आरोपी ही बाहेरील राज्यांतील गरीब महिलांना पैशांचे आमिष दाखवून देहव्यापारास प्रवृत्त करत असल्याचे उघड झाले आहे. छाप्यात दोन महिलांची सुटका करण्यात आली असून त्यापैकी एक महिला ओडिशा राज्यातील असल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर महिलांना संरक्षण व पुनर्वसनासाठी सुरक्षित स्थळी ठेवण्यात आले आहे. कारवाईदरम्यान घटनास्थळावरून रोख रक्कम रुपये 5,000/- व एक मोबाईल फोन किंमत अंदाजे रुपये 10,000/- असा एकूण 15,000/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस ठाणे बेलतरोडी येथे अपराध क्र. 112/2026 अन्वये अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम 1956 चे कलम 4, 5, 7, 8 तसेच बीएनएस कलम 143 (3) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीस अटक करण्यात आलेली आहे. पुढील तपास सुरू आहे. सदर कारवाई पोलीस उपायुक्त, परिमंडळ नागपूर शहर व सहा. पोलीस आयुक्त, अजनी विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे बेलतरोडी यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

**■ नागरिकांना आवाहन करण्यात येते की, आपल्या परिसरात कोणत्याही प्रकारचे अनैतिक, बेकायदेशीर किंवा संशयास्पद प्रकार आढळल्यास तात्काळ पोलिसांना कळवावे. माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल.**

## अंशकालीन स्त्री परिचर कृती समितीच्या लढ्यालाला यश

### अंशकालीन अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचरांना तीन हजारांची भरगोस वाढ; शासनाचा मोठा निर्णय.

**▸विदर्भ केसरी। यवतमाळ**




यवतमाळ - आयटक संलग्न महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते अंशकालीन स्त्री परिचर कृती समितीच्या लढ्यालाला मोठे यश आले आहे. महाराष्ट्रभरातील अंशकालीन अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचय यांच्या पगारांमध्ये महाराष्ट्र शासनाने मुंबई येथे दिनांक 17 मार्च 2026 रोजी दरमहा तीन हजारांची भरघोस मानधन वाढ करण्यात आली आहे. आता या पुढे दरमहा सहा हजार रुपये मिळतील.सदर मानधन वाढ दि. 1 एप्रिल 2026 पासून लागू होईल व दरमहा 10 तारखेच्या आत खात्यावर मोबदला जमा करण्याचा निर्णय दिला आहे. त्यामुळे राज्यातील पंधरा हजार व यवतमाळ जिल्ह्यातील जवळजवळ 450 अंशकालीन स्त्री -परिचर महिलांना याचा प्रत्यक्ष फायदा होईल. अशी माहिती आयटकचे राज्याचे नेते कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे, कॉ.नामदेव चव्हाण व अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर कृती समितीचे नेते कॉम्रेड दिवाकर नागपुरे यांनी दिली आहे.

आयटक संघटनेच्या राज्य कृती समितीच्या वतीने; गेली सात ते आठ वर्ष सातत्याने नागपूर हिवाळी विधीमंडळ अधिवेशन, मुंबई अर्थसंकल्प विधीमंडळ अधिवेशनावर मोर्चे, धरणे आंदोलने केली गेली होती. त्याचप्रमाणे राज्यात ठीक ठिकाणी जिल्हास्तरीय जेलभरो , मोर्चे , धरणे आंदोलने करून पगारवाढीच्या प्रश्नाकडे सातत्याने आयटक या संघटनेने लक्ष वेधले होते. त्याचप्रमाणे राज्यातील आमदारांना निवेदने देखील दिली गेली होती. या संपूर्ण संघर्षाला मोठे यश प्राप्त झाल्याने महिलांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

अंशकालीन अर्धवेळ आरोग्य स्त्री परिचर या सुरवातीला पन्नास रुपये दरमहा पासून काम करत आल्या आहेत. गेली 30 ते 35 वर्ष अल्प मोबदल्यावर त्या काम करत आहेत. येणाऱ्या काळात त्यांना शासन कर्मचारी दर्जा मिळावा. किमान वेतन मिळावे, रजा, ग्रॅज्युएजी, पेन्शन , वाढीव बोनस, कोरोना काळातील प्रोत्साहन भत्ता मिळावा यासाठी लढा सुरूच राहणार आहे. राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर साहेब राज्य शासन व अंशकालीन स्त्री परिचर आंदोलनाची दखल घेऊन निर्णय घेतला या बद्दल आयटक व कृती समिती वतीने राज्य संघटनेकडून त्यांचे मनःपूर्वक धन्यवाद व्यक्त करण्यात आले आहेत. राज्याचे नेते कॉम्रेड कॉम्रेड नामदेव चव्हाण , कॉम्रेड राजू देसले, कॉम्रेड शाम काळे , कॉम्रेड निलेश दातखिळे, कॉम्रेड ॲड.बळवंत पवार, कॉम्रेड दिलीप उटाणे कॉम्रेड हमिदा शेख, कॉम्रेड इंदुमती केवट, कॉम्रेड प्रवीण मस्तुद, कॉम्रेड शिवाजी फुलवाले, कॉम्रेड दिवाकर नागपूरे , कॉम्रेड चित्रा जगताप, कॉम्रेड देविदास बोन्द्रडे, कॉम्रेड शालूबाई कुथे, कॉम्रेड अब्दुल गफार, कॉम्रेड रत्नप्रभा गायकवाड, कॉम्रेड सुचिता गायकवाड, कॉम्रेड मुगाजी बुरुड, कॉम्रेड देविदास जिंगे आदींनी मोठा संघर्ष प्रयत्न केला आहे.

# गुढीपाडव्याला 72 फूट उंच झेंड्यांना खोळ चढविण्याचा नेत्रदीपक व चित्तथरारक सोहळा

### सावंगा (विठोबा) येथे गुढीपाडवा-रामनवमी यात्रा महोत्सव १८ ते २७ मार्च दरम्यान : लाखो भाविकांची उपस्थिती अपेक्षित; संस्थानची नियोजनबद्ध जय्यत तयारी

**▸विदर्भ केसरी। चांदूर रेल्वे :-**

महाराष्ट्रातील विदर्भात प्रसिद्ध आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या अमरावती जिल्ह्यात चांदूर रेल्वे तालुक्यातील श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थानच्या वतीने भव्य गुढीपाडवा–रामनवमी यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव दि.१८ मार्च ते २७ मार्च २०२६ या कालावधीत मोठ्या उत्साहात पार पडणार असून लाखो भाविक उपस्थित राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. यात्रेचे मुख्य आकर्षण असलेला महाराजांच्या झेंड्यांचा चित्तथरारक व नेत्रदीपक सोहळा गुढीपाडव्याच्या दिवशी दि.१९ मार्च (गुरुवार) रोजी दुपारी सुमारे ४ वाजता पार पडणार आहे. अखंड कापूर ज्योती, बासन (टाळ) ढोलकी (मृदंग)चा गजर,हजारोच्या संख्येने नगरीत आलेल्या अवधूत भजन मंडळाच्या मांडीचे सुमधूर गायनात आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात हा सोहळा पार पडतो. शेकडो क्विंटल कापूर विक्रीचा अंदाज असून संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून जाणार आहे. संस्थानचे विश्वस्त चरणदास नामदेवराव कांडलकर यांच्या शुभहस्ते महाराजांच्या बोहलीचे विधीवत पूजन करून दोन्ही झेंड्यांना नवीन खोळ (कापड) चढविण्यात येणार आहे. झेंड्यांना पायाचा स्पर्श होऊ नये म्हणून दोरांच्या सहाय्याने झेंड्यांची जुनी खोळ काढून नविन खोळ चढवली जाते. हा सोहळा विश्वस्त मंडळ व लाखो भाविकांच्या साक्षीने पार पडणार आहे. अवधूत संप्रदायातील भाविकांनी गावोगावी स्वयंप्रेरणेने यात्रेचे बॅनर लावून वातावरण निर्मिती केली आहे. महोत्सवाची सुरुवात दि. १८ मार्च (बुधवार) रोजी अमावस्या निमित्त सायंकाळी ५ वाजता चंदन-उटी व रमणा कार्यक्रमाने होणार आहे. त्याच दिवशी सकाळी ७ ते १० या वेळेत मंदिर व ग्राम परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. यात्रेदरम्यान भाविकांच्या सोयीसाठी संस्थानतर्फे विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. कडाक्याच्या उन्हाचा विचार करून दर्शन मंडपावर हिरवी नेट टाकून सावलीची व्यवस्था करण्यात आली आहे.संस्थानचे वतीने पिण्याच्या पाण्याची सोय म्हणून टँकर द्वारे पाणी पुरवठा,अन्नदान, तसेच बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांसाठी गावाबाहेरील संस्थानचे अधिकृत मंडपात प्रसादाची(अन्नदान) व्यवस्था करण्यात आली आहे. भजनासाठी येणाऱ्या अवधूत भजन मंडळांसाठी व भाविकांसाठी (प्रसादालयाचे मागील शेतात) संस्थानचे वतीने भव्य मंडपात बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. गर्दी नियंत्रणासाठी स्वयंसेवकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले असून कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस प्रशासन सुद्धा सतर्क आणि दक्ष राहणार आहे. आतापर्यंत झेंडे चढविताना दर्शन बंद ठेवण्याची प्रथा होती; मात्र मागील वर्षापासून झेंड्यांची खोळ चढवितानाही दर्शन सुरू ठेवण्यात येत असल्याने भाविकांची गैरसोय टळणार आहे. दि.२० ते २७ मार्च २०२६ या कालावधीत दररोज अवधूत नामप्रचारक महाराजांच्या गाथेतील ओव्यांवर आधारित प्रवचने आयोजित करण्यात आली आहेत. दि.२६ मार्च (गुरुवार) रोजी रामनवमी निमित्त चंदन-उटी व रमणा, तर दि. २७ मार्च रोजी चैत्र मांडी वाढवा,बाहेर गावातील सहभागी अवधूत भजन मंडळासह रमणा पालखी व ढालीचा सोहळा व निमंत्रित मान्यवरांच्या हस्ते सत्कार समारंभ आणि भाविकांसाठी भव्य महाप्रसाद कार्यक्रम होणार आहे. गुढी पाडव्याचे दिवशी यात्रेत बाहेरगावाहून येणाऱ्या लाखो भाविकांसाठी संस्थानची अन्नदान समिती आणि सेवाभावी मंडळाचे वतीने प्रसाद(अन्नदान) व्यवस्था करण्यात आली आहे. आग सुरक्षिततेच्या दृष्टीने भाविकांनी कापूर सुरक्षित अंतर ठेवून आणि कमी प्रमाणात जाळावा,तलावात गाळ असल्यामुळे जिवीत हाणी टाळण्यासाठी अनओळखीचे पाणी क्षेत्रात कोणीही आंघोळ करू नये,यात्रेचे गावातील नदीवरील पुल व गावात येणारे सर्व रस्ते नादुरुस्त आणि अपघातग्रस्त असल्यामुळे वाहन सावकाश चालवावे,यात्रेत मौल्यवान दागिने घालून येवू नये,भाविकांनी खि से कापू पासून सावध रहावे,भाविकानी अवैध वाहनाने प्रवास न करता अमरावती,चांदुर रेल्वे, बडनेरा,नेर(परसोपंत) आगरातील एस्.टी. यात्रा-बसने सुरक्षित प्रवास करावा. तसेच भाविकांनी प्रशासनाला सहकार्य करावे,या यात्रा महोत्सवात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा तसेच यात्रा महोत्सव यशस्वी करण्यासाठी शांतता,



सुव्यवस्था व स्वयंशिस्त पाळावी, असे आवाहन श्री विठोबा संस्थान विश्वस्त मंडळ:अध्यक्ष पुंजाराम नेमाडे,उपाध्यक्ष कृपासागर राऊत,सचिव अशोक सोनवाल सर्व विश्वस्त विनायक पाटील,गोविंद राठोड,फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर,प्रविण कुकडकर, लक्ष्मण राठोड,वैभव मानकर,स्वप्नील चौधरी यांच्या तर्फे करण्यात आले आहे.

Selected

## गुडीपाडवा (मराठी नववर्ष) यात्रा निमित्य विविध कार्यक्रमाचे आयोजन !




चामोर्शी :- चामोर्शी तालुक्यातील निसर्गरम्य देवस्थान मुतनुर (पहाडी ) येथे आदिवासी समाजाचे राजाराणी देवस्थान आहे व या ठिकाणी खालच्या भागात खुणे कंट्रक्शन कंपनीचे प्रमुख प्रणय खुणे परिवार गुरनोली यांचे आराध्य दैवत आदिशक्ती दुर्गामाता मंदिर आहे या मंदिरात गेल्या अनेक वर्षापासून गुढीपाडवा (मराठी नववर्ष) निमित्य गावकर्यांच्या वतीने संपूर्ण मुतणुर व परिसरातील यात्रेकरू नागरिकांकरिता विविध धार्मिक कार्यक्रम असतो यावर्षी सदर महापूजा व विविध कार्यक्रम देवस्थान मुतनूर पहाडी येथे आयोजन केले आहे. तरी गडचिरोली जिल्ह्यातील समस्त भाविक भक्त यांनी आयोजित या दिव्य महापूजा व आयोजित विविध कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन खुणे कंट्रक्शन कंपनीचे प्रमुख प्रणय खुणे व लोकेश डोंगरवार , राकेश डोंगरवार राहुल झोडे, दिनेश खुणे व संपूर्ण खुणे परिवार गुरनोली यांनी केले आहे.

---

## दिव्यांग लाभार्थ्यांच्या अनुदानात वाढ..

गडचिरोली :- दिव्यांग लाभार्थ्यांच्या अनुदानात १०००/- रु. ची वाढ करून २५००/- इतके अनुदान D.B.T. प्रणाली व्दारे देण्यात येत आहे. करीता लाभार्थ्यांचे ऑनलाईन UDID कार्ड (दिव्यांग प्रमाणपत्र) पोर्टलवर अपडेट करणे आवश्यक आहे. दिव्यांग कल्याण विभागाच्या सामाजिक सुरक्षा योजनेतील दिव्यांग लाभाच्यांचे UDID आधार संलग्नीकरण करणबाबत ५ मार्च, २०२६ रोजी आढावा बैठक आयोजीत करण्यात आली होती. यामध्ये जिल्ह्यातील संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ राज्य निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग योजनेतील लाभार्थ्यांना UDID व आधार संलग्न नसल्याबाबतची माहीती सभेमध्ये सादर केली असुन सदर लाभार्थ्यांची माहीती DBT प्रणालीवरील माहीती अपडेट करण्याचे निर्देश दिलेले आहे. दिव्यांग लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये म्हणून लाभार्थ्यांनी आपले UDID कार्ड आधार क्रमांक व बँकेचे पासबुक झेरॉक्स गावातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) किंवा तहसिल कार्यालय संजय गांधी योजना येथे दि. २०.०३.२०२६ पुर्वी जमा करावे तसेच दिव्यांग UDID Portal वरुन e-KYC करण्याबाबतचे निर्देश देण्यात आलेले आहे.

---

## अंशकालीन स्त्री परिचारांच्या मानधनात ३ हजार रुपयांची वाढ

गडचिरोली:-राज्यातील सुमारे १० हजार स्त्री परिचारानी मानधन वाढ व किमान वेतनासाठी प्रदीर्घ लढा केला. भर पावसाळ्यात प्रदीर्घ संपही केला.त्यावेळी आरोग्यमंत्र्यांनी मानधनांमध्ये ३ हजार रुपये वाढ करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु त्याची पूर्तता केली नव्हती. त्यामुळे राज्यभर सतत आंदोलने होत होती. तसेच स्त्री परिचार, अंगणवाडी,, आशा, शालेय पोषण कर्मचाऱ्यांनी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, सिटूच्या नेतृत्वात राजुर तालुका अकोले ते लोणी लॉग मार्चही काढला होता. त्यावेळी ही संबंधित आरोग्यमंत्र्यांनी ३ हजार रुपये वेतन वाढ देण्याचे आश्वासन दिले होते. परिणामी १७ मार्च २०२६ रोजी शासनाने परिपत्रक काढून अंशकालीन स्त्री परिचराच्या मानधनात ३ हजार रुपये वाढ करण्याचा निर्णय निर्गमित केला आहे. या निर्णयामुळे अंशकालीन स्त्री परिचरांना अंशतः न्याय मिळाला असला, तरी त्यांचे मुख्य आरोग्य सेवेत कायम करणे व किमान वेतन दरानुसार रु.१६,८००/- वेतन मिळावे ही मागणी प्रलंबित आहे. शासनाने त्यांना कायम सेवेत सामावून घ्यावे व तोपर्यंत किमान वेतन रु.१६,८००/- लागू करावे अशी मागणी भारतीय ट्रेड युनियन केंद्र (सिटू) च्या वतीने करण्यात आली आहे. सिटू कामगार संघटना ही स्त्री परिचर कर्मचाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे.

# राज्यात प्लास्टिक फुलांवर बंदी!

## सरकार अधिसूचना काढणार; प्लास्टिकचे सुशोभीकरण केल्यास कारवाई

विदर्भ केसरी । गडचिरोली

राज्यात प्लास्टिकवर बंदी असली तरी शेतकऱ्यांचा फूलबाजार प्लास्टिक फुलांनी काबीज केला आहे. त्यामुळे प्लास्टिक फुलांवर बंदीसंदर्भात अधिसूचनाकाढली जाईल. अशा प्लास्टिक फुलांवरील कारवाईचे अधिकार सर्व महापालिकांना देण्यात येतील. प्लास्टिक फुलांचा वापर करणारे सजावटकार तसेच संमारंभ हॉल, सभागृहांना नोटिसा दिल्या जातील, नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत जाहीर केले. राज्यात सण-उत्सव, लग्नसमारंभात प्लास्टिकच्या फुलांचा वापर सर्रास होत असून यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येत असल्याकडे तारांकित प्रश्नाद्वारे प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे यांनी लक्ष वेधले. प्लास्टिकच्या फुलांमुळे पर्यावरणाची हानी तर होतेच याशिवाय नैसर्गिक



फुले विकली जातात. बंदी असतानाही बाजारात प्लास्टिकची फुले येतात कशी, मुंबईतील लोहार चाळ परिसरात फ्लास्टिकची फुले सर्रास दिसत असल्याचे शिंदे म्हणाले. आमदार ॲड. अनिल परब, अमित गोरखे, अमोल मिटकरी यांनीही यावेळी चर्चेत सहभाग घेतला. प्लास्टिक फुलांच्या वापरामुळे निसर्गचक्रावरही गंभीर परिणाम होत असून मागील पावसाळी अधिवेशनात प्लास्टिक फुलांवर बंदी करण्याची घोषणा करण्यात आली मात्र त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले नसल्याची बाब श्रीकांत भारतीय यांनी निदर्शनास आणली.

यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्लास्टिक फुलांवर बंदीसंदर्भात अधिसूचना काढण्यात येईल असे जाहीर केले.राज्यात प्लास्टिक आणि थर्माकोलवर पूर्णतः बंदी आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने २९ ऑगस्ट २०२५ रोजी सण-उत्सव काळात कृत्रिम फुलांचा वापर टाळण्याबाबत परिपत्रक जारी केले आहे.

एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत १,२४,७८३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली, यापैकी ३,३९० आस्थापनांवर कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडून १.५५ कोटी दंड वसूल करण्यात आला तसेच ६७.५४ मेट्रिक टन एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आल्याची माहिती पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.राज्यात सण-उत्सव, लग्नसमारंभात प्लास्टिकच्या फुलांचा वापर सर्रास होत असून यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येत असल्याकडे तारांकित प्रश्नाद्वारे प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे यांनी लक्ष वेधले. प्लास्टिकच्या फुलांमुळे पर्यावरणाची हानी तर होतेच याशिवाय नैसर्गिक फुले विकली जातात. बंदी असतानाही बाजारात प्लास्टिकची फुले येतात कशी, मुंबईतील लोहार चाळ परिसरात फ्लास्टिकची फुले सर्रास दिसत असल्याचे शिंदे म्हणाले. आमदार ॲड. अनिल परब, अमित गोरखे, अमोल मिटकरी यांनीही यावेळी चर्चेत सहभाग घेतला. प्लास्टिक फुलांच्या वापरामुळे निसर्गचक्रावरही गंभीर परिणाम होत असून मागील पावसाळी अधिवेशनात प्लास्टिक फुलांवर बंदी करण्याची घोषणा करण्यात आली मात्र त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले नसल्याची बाब श्रीकांत भारतीय यांनी निदर्शनास आणली.


### प्लास्टिकच्या फुलांमुळे पर्यावरणाची हानी

एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीत १,२४,७८३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली, यापैकी ३,३९० आस्थापनांवर कारवाई करण्यात आली.राज्यात सण-उत्सव, लग्नसमारंभात प्लास्टिकच्या फुलांचा वापर सर्रास होत असून यामुळे शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येत असल्याकडे तारांकित प्रश्नाद्वारे प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे यांनी लक्ष वेधले. प्लास्टिकच्या फुलांमुळे पर्यावरणाची हानी तर होतेच याशिवाय नैसर्गिक फुले विकली जातात.

## रंगय्यापल्ली उपकेंद्राला कायम कुलूप आरोग्य सेविका अनुपस्थितीमुळे ग्रामस्थांची गैरसोय..

विदर्भ केसरी । सिरोंचा

तालुक्यातील रंगय्यापल्ली येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या कार्यप्रणालीबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले असून, स्थानिक ग्रामस्थांकडून वारंवार तक्रारी समोर येत आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, उपकेंद्र बहुतांश वेळा बंद अवस्थेत दिसून येते आणि अनेक वेळा केंद्राला कुलूप लावलेले असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणले आहे. गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, उपकेंद्रात नियुक्त असलेली आरोग्य सेविका येथे नियमितपणे उपस्थित राहत नसल्याने आरोग्य सेवा प्रभावीपणे मिळत नाही. परिणामी, साध्या ताप, सर्दी, जखम यांसारख्या सामान्य आजारांसाठीही नागरिकांना दूरच्या प्राथमिक आरोग्य केंद्राकडे (PHC) किंवा खाजगी डॉक्टरांकडे जावे लागत आहे. आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर उपचार न मिळाल्यास गंभीर परिणाम



होण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. यामुळे ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवर अतिरिक्त खर्चाचा बोजा पडत असून, आरोग्य सेवांच्या अभावामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. “शासनाकडून सुविधा उपलब्ध असूनही प्रत्यक्षात त्या मिळत नाहीत,” अशी भावना अनेक ग्रामस्थांनी व्यक्त केली. दरम्यान, उपकेंद्राच्या परिसरातही अस्वच्छतेचे चित्र पाहायला मिळत आहे. इमारतीभोवती कचरा साचलेला, झाडाझुडपे वाढलेली असून, नियमित स्वच्छतेचा अभाव जाणवत आहे. यामुळे रुग्णांच्या आरोग्यावरच उलट परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे खालील प्रमुख मागण्या केल्या आहेत:

1.उपकेंद्र नियमित सुरू ठेवावे व कायम खुले ठेवावे.

2.आरोग्य सेविकेची नियमित उपस्थिती सुनिश्चित करावी.

3.उपकेंद्र परिसराची स्वच्छता व देखभाल करावी.

4.तातडीच्या आरोग्य सेवांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

गावकऱ्यांनी इशारा दिला आहे की, जर लवकरात लवकर परिस्थिती सुधारली नाही तर उच्च अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करून आंदोलनाचा मार्ग स्वीकारला जाईल.

## कुरखेडा तालुक्यात पावसाळ्यापूर्वी पाणंद रस्त्यांचे काम सुरू करा..!

विदर्भ केसरी । कुरखेडा

कुरखेडा तालुक्यातील शेतकरी बांधवांना पावसाळ्यात आपल्या शेतापर्यंत जाण्यासाठी तारेवरची कसरत करून जावं लागते सोबतच शेतात ट्रॅक्टर रोटावेटर व इतर यंत्र सामग्री नेतांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागतो त्यामुळे पावसाळ्यापूर्वी कुरखेडा तालुक्यात मातोश्री ग्राम समृद्धी योजना अंतर्गत पांदन रस्त्याचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे असे मागणी भाजपा ओबीसी जिल्हा महामंत्री तथा माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेवक रवींद्र गोटेफोडे यांनी केली आहे. तालुक्यामधील काही गाव वगळता बरेच गावात पानंद रस्त्या अभावी बारमाही पक्के रस्ते खडीकरन तयार केले गेले नाही. यामुळे शेतीमाल व यंत्रसामग्रीची वाहतूक सोपी होण्यास शेतकऱ्यांना



अडचण जाणवत आहे. पावसाळ्यापूर्वी पांदण रस्त्याचे काम सुरू झाल्यास शेतात जाण्यासाठी सोयीस्कर रस्ते तयार होतील सोबतच शेतकऱ्यांना व मजुरांना शेतमाल वाहतूक करण्यासाठी अडचण जाणवणार नाही. बरेच गावात शेतकरी बांधवांनी पाणंद रस्त्यांवर अतिक्रमणे केले आहे ते हटवून, तो रस्ता दुरुस्त केला करण्यात यावे त्यामुळे या मार्गावरील सर्वच शेतकरी बांधवाना आपला शेतमाल थेट बाजारपेठेत सहज पोहोचवू शकतात.

सदर पांदण रस्ता तयार करण्याकरिता शेतकरी बांधवांनी गावाच्या नकाशात दर्शवलेले नकाशात असलेले पाणंद रस्ते या योजनेसाठी पात्र आहेत. शेतकऱ्यांनी आपल्या गावातील पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी ग्रामसभेत प्रस्ताव मंजूर करावा. प्रस्ताव पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद विभागाकडे सादर करावा. जेणेकरून प्रस्ताव मंजूर झाल्यास शेतकऱ्यांना शेतापर्यंत बारमाही रस्ता उपलब्ध होईल व गावातील शेतरस्त्यांची अतिक्रमणे दूर होतील व शेतमाल वाहतुकीसाठी सोपे जाणार याकरिता जी रामजी अंतर्गत पांदण रस्ते मंजूर करून पावसाळ्यापूर्वी काम सुरू करण्यात यावे अशी मागणी केली आहे.

## पंडित दिनदयाल उपाध्याय महिला रोजगार मेळावा यशस्वीरित्या संपन्न!

विदर्भ केसरी । गडचिरोली

नोकरी शोधणारे व नोकरी देणारे यांना एकाच व्यासपीठावर आणून बेरोजगार उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे व नियोक्ता / उद्योजकांना कुशल मुनष्यबळ उपलब्ध करून देण्याकरीता जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, गडचिरोली, महिला महाविद्यालय, गडचिरोली व फुले, आंबेडकर महाविद्यालय , गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक 18 मार्च 2026 रोजी महिला महाविद्यालय, चंद्रपूर रोड, गडचिरोली येथे पंडित दिनदयाल उपाध्याय महिला रोजगार मेळावा उत्साहात व यशस्वीरित्या संपन्न झाला. सदर रोजगार मेळाव्यास एकुण 100 पेक्षा अधिक उमेदवारांनी सहभाग नोंदविला आहे. LIC, गडचिरोली व संसूर श्रुष्टी या नामांकित दोन उद्योजकांनी सहभाग घेतलेला असून दोन्ही उद्योजकांनी विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहे.सदर रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी उद्योजकामार्फत उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यांत आल्या. त्यामध्ये एकुण 46 उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यांत आलेली आहे. व उर्वरित उमेदवारांना पुढील प्रक्रियेसाठी मार्गदर्शन करण्यांत आले आहे. पंडित दिनदयाल उपाध्याय महिला रोजगार मेळाव्यास अध्यक्ष्य म्हणून लाभलेले प्राचार्य, डॉ.योगेश पाटील, महिला महाविद्यालय,गडचिरोली तसेच प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले प्राचार्य डॉ.रूपेंद्रकुमार गौर, फुले ,आंबेडकर, कॉलेज ऑफ सोशल वर्क, गडचिरोली तसेच जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे व मॉडेल करिअर सेंटरचे यंग प्रोफेशनल श्रीमती प्रियंका इडपात्रे यांनी रोजगार मेळाव्याचे प्रास्ताविक केले. तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभलेले प्राध्यापक डॉ.कुंदन दुफारे, महिला महाविद्यालय,गडचिरोली यांनी उपस्थित उमेदवारांना मार्गदर्शन केले. सर्व प्रमुख पाहुण्यांनी उमेदवारांना सदर रोजगार मेळाव्यातील रोजगाराच्या संधीचा लाभ घेण्याबाबत आवाहन केले. त्यानंतर उद्योजकांनी त्यांच्याकडील विविध रिक्त पदांबददल उमेदवारांना मुलाखती घेवून माहिती दिली.

## गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालय येथे 'जागतिक ग्राहक हक्क दिन' उत्साहात साजरा

विदर्भ केसरी । गडचिरोली

सदर आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीमती प्रतिभा पाटील, सदस्य, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, गडचिरोली आणि अध्यक्ष सादिक झवेरी, माजी अध्यक्ष जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, गडचिरोली तसेच प्रमुख अतिथी श्रीमती माधुरी आटमांडे, सदस्य, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, गडचिरोली, श्रीमती नेहा हांडे, पी.एस.आय. सायबर सेल, पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली, चंद्रशेखर भडांगे, अशासकीय सदस्य जिल्हा ग्राहक संरक्षण समिती, गडचिरोली, प्रविण घाटे, अशासकीय सदस्य, जिल्हा ग्राहक संरक्षण समिती, गडचिरोली, सुरज मेश्राम, अशासकीय सदस्य, जिल्हा ग्राहक संरक्षण समिती, गडचिरोली, संजय धकाते, जिल्हा संघटक, ग्राहक पंचायत, गडचिरोली, विजय चाटे, जिल्हा अध्यक्ष, ग्राहक संरक्षण समिती, गडचिरोली तसेच कमलेश तुमसरे, जिल्हा प्रबंधक, ग्राहक तक्रार निवारण आयोग, गडचिरोली यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाला नागरिक, विद्यार्थी आणि ग्राहक चळवळीतील कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. सुधाकर पवार जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली यांनी प्रस्ताविक केले असून या आधुनिक काळात सायबर क्राईम व्दारे होणाऱ्या फसवणुकी पासुन सावधानता कशी बाळगावी त्याकरीता आवश्यक उपाययोजना कश्या कराव्या याबाबत अतिशय चांगली माहिती श्रीमती नेहा हांडे, पी.एस. आय. सायबर सेल, पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली यांनी दिली आहे. तसेच इतर वक्त्यांनी सांगितले की, "बदलत्या काळात बाजारपेठ विस्तारत असताना ग्राहकांनी केवळ वस्तू खरेदी न करता, त्यातील गुणवत्ता, किंमत आणि सुरक्षेबाबत सजग राहणे गरजेचे आहे. 'ग्राहक राजा' संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी हक्कांसोबतच कर्तव्याची जोड हवी" आहे. तसेच ग्राहकांवर अन्याय झाल्यास स्वतः पुढाकार घेऊन जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, गडचिरोली यांच्याकडे रीतसर तक्रार नोंदविणे आवश्यक असल्याचे मत सादिक झवेरी, माजी अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, गडचिरोली यांनी व्यक्त केले. जेणेकरून त्यांना न्याय देण्यास मदत होईल. जागतिक ग्राहक हक्क दिनाचे प्रबोधन व्हावे या दृष्टीकोनातून अन्न व औषध प्रशासन विभाग, गडचिरोली, वैधमापन शास्त्र गडचिरोली, भारत संचार निगम लिमीटेड, श्री. गॅस एजन्सी गडचिरोली, कृषी विभाग, गडचिरोली यांचेमार्फत प्रदर्शनी लावण्यात आली होती. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रुपचंद फुलझेले यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीमती अश्विनी आसवले जिल्हा पुरवठा कार्यालय, गडचिरोली यांनी केले. सदर आयोजित प्रदर्शनी करीता गडचिरोली जिल्हयातील नागरीकांचा उत्सफूर्त सहभाग होता.

# गर्भावस्थेपासून वृद्धत्वापर्यंत शासनाची साथ

## भामरागड येथे मल्टिमीडिया प्रदर्शन; लाभ घेण्याचे आवाहन

विदर्भ केसरी । गडचिरोली

नागरिकांच्या जीवनातील प्रत्येक टप्प्यावर—गर्भावस्थेपासून ते वृद्धत्वापर्यंत—शासन विविध जनकल्याणकारी योजना राबवत आहे. या योजनांचा नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा,” असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे यांनी केले. जिल्हा प्रशासन, जिल्हा पोलीस प्रशासन व सामाजिक न्याय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा माहिती कार्यालयामार्फत तहसील कार्यालय, भामरागड येथे



शासनाच्या विविध योजनांवरील मल्टिमीडिया छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाची पाहणी करताना ते बोलत होते. यावेळी श्री. गाडे यांनी विविध विभागांच्या योजनांची माहिती प्रत्यक्ष पाहून समाधान व्यक्त केले. दुर्गम व नक्षलग्रस्त भागातील नागरिकांपर्यंत शासनाच्या योजनांची माहिती प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले. नागरिकांनी मोठ्या संख्येने प्रदर्शनाला भेट देऊन शिक्षण, आरोग्य, कृषी, महिला व बालकल्याण, सामाजिक न्याय, रोजगार व कौशल्य विकास आदी विभागांच्या योजनांची माहिती जाणून घ्यावी व त्याचा लाभ घ्यावा, असे त्यांनी आवर्जून सांगितले. या प्रदर्शनामध्ये विविध योजनांची माहिती मल्टिमीडिया दृकश्राव्य माध्यमांसह माहितीपर फ्लेक्स पॅनलद्वारे सादर करण्यात आली आहे. शासनाच्या प्रमुख योजना, पात्रता निकष, अर्ज प्रक्रिया व लाभ याबाबत सविस्तर माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी गजानन जाधव व तहसीलदार किशोर बागडे उपस्थित होते.







Selected

## अनुसुचित जमातीच्या उमेदवांराकरीता स्पर्धा पुर्व प्रशिक्षण कार्यक्रम

गडचिरोली :- आदिवासी उमेदवांराकरीता कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता माहीती व मार्गदर्शन केद्र, गडचिरोलीच्या वतीने जिल्यातील अनुसुचित जमातीच्या उमेदवांराकरीता MPSC पुर्व प्रशिक्षण, जिल्हा निवड समीतीच्या विविध पदभरती बाबत तसेच IBPS, SSC च्या परीक्षा बाबत स्पर्धा पुर्व प्रशिक्षण कार्यक्रम विनामुल्य राबविण्यात येत आहे. सदर प्रशिक्षण घेऊ इच्छीणा-या उमेदवांराकडे शालांत परीक्षा उतीर्ण प्रमाणपत्र व रोजगार नोदंणी कार्ड (EMPLOYMENT CARD )असणे आवश्यक आहे. प्रशिक्षणाचा कालावधी साडेतीन महीने आहे. प्रशिक्षणा दरम्यान रु.1000 ( एक हजार रुपये ) दरमहा विदयावेतन दिले जाईल. प्रशिक्षण पुर्ण करणा-या उमेदवांराना चार पुस्तकांचा संच व प्रमाणपत्र देण्यात येते. कार्यालयात अर्ज विनामुल्य उपलब्ध आहेत. तसेच अर्ज दि.01/03/2026 पासुन 24/03/2026 पर्यत या कार्यालयात सादर करावेत मुलाखत दि.25/03/2026 रोजी आदिवासी उमेदवांराकरीता कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता माहीती व मार्गदर्शन केद्र, शासकीय संकुल बॅरेक क्र.2 गडचिरोली येथे घेण्यात येणार आहे त्याकरीता उपस्थित राहावे अधिक माहीतीसाठी 8485814488 या क्रमाकांवर संपर्क साधावा. असे आवाहन कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन अधिकारी यांनी केले आहे.

---

## २४ तासांत आरोपी जेरबंद ; लांझेडा येथील हत्या प्रकरणाचा उलगडा.!




गडचिरोली :- शहरातील लांझेडा परिसरात घडलेल्या खळबळजनक हत्या प्रकरणाचा पोलिसांनी अवघ्या २४ तासांत छडा लावून आरोपीला अटक केली आहे. पैशांच्या वादातून ही हत्या झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. प्राप्त माहितीनुसार, लांझेडा येथील रहिवासी सचिन कोल्हेकर यांची सोमवारी निर्घृण हत्या करण्यात आली. आरोपी महेश बुरांडे हा घटनेनंतर फरार झाला होता. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी तातडीने विशेष पथक तयार करून आरोपीच्या शोधाला सुरुवात केली. तपासादरम्यान धक्कादायक माहिती समोर आली. मृत सचिन यांनी महेशला फर्निचर बनवण्यासाठी सुमारे १ लाख २० हजार रुपये दिले होते. मात्र, अनेक वर्षे उलटूनही ना फर्निचर तयार झाले, ना पैसे परत मिळाले. यावरून दोघांमध्ये वाद निर्माण झाला होता. सोमवारी आरोपीने सचिन यांना लांझेडा येथील घरी बोलावले. त्यानंतर दोघांमध्ये जोरदार वाद झाला. संतापाच्या भरात आरोपीने घरातून मिरची पावडर आणून सचिन आणि त्यांच्या सोबत असलेल्या व्यक्तीवर फेकली. या गोंधळाचा फायदा घेत त्याने फर्निचर बनवण्याच्या अवजाराने सचिन यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात सचिन यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. तसेच आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याचा शोध घेण्यासाठी विशेष पथक कार्यरत केले. दरम्यान, मंगळवारी आरोपी लपून बसल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली. अवघ्या २४ तासांत आरोपीला जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे. पोलिसांचा तपास सुरू असून पुढील कारवाई करण्यात येत आहे.

# राज्यात लवकरच १४०० डॉक्टरांची भरती

## रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर नेमणार : आरोग्यमंत्री

विदर्भ केसरी। मुंबई

राज्यातील नागरिकांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी लवकरच १४०० डॉक्टरांची भरती केली जाणार आहे. विशेष करून आदिवासी भागातील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर आणि तज्ज्ञ डॉक्टर्सही नेमण्याबरोबरच त्यांचे मानधन वाढविण्याला प्राधान्य देणार असल्याची घोषणा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधान परिषदेत केली. राज्यातील ग्रामीण रूग्णालयात गर्भवती महिलांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी डॉक्टर्स आणि तज्ज्ञ डॉक्टर्सचा असलेला अभाव आणि नादुरूस्त अवस्थेत असलेल्या रुग्णवाहिकासंदर्भात काँग्रेस आमदार राजेश राठोड यांनी विधान परिषदेत नियम ९३ अन्वये चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेला उत्तर देताना मंत्री प्रकाश आबिटकर बोलत होते.राज्यात १४०० डॉक्टरांची भरती केली जाणार आहे. या भरतीबरोबरच ग्रामीण भागातील रुग्णालयांची माहिती घेऊन तेथे या सर्व नेमणुका केल्या जातील. विशेषत: आदिवासी भागातील डॉक्टर्सच्या नेमणुका करणे, डॉक्टरांचे मानधन वाढविणे आदी गोष्टींना प्राधान्य



दिले असून त्यांना गती देऊन मार्गी लावण्यात येईल, अशी ग्वाही मंत्री आबिटकर यांनी यावेळी दिली.राज्यातील ग्रामीण रूग्णालयात गर्भवती महिलांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी डॉक्टर्स आणि तज्ज्ञ डॉक्टर्संचा असलेला अभाव आणि नादुरूस्त अवस्थेत असलेल्या रुग्णवाहिकासंदर्भात काँग्रेस आमदार राजेश राठोड यांनी विधान परिषदेत नियम ९३ अन्वये चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेला उत्तर देताना मंत्री प्रकाश आबिटकर बोलत होते.दरम्यान, १०२ नंबरच्या रुग्णवाहिका या आता १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेप्रमाणे काम करेल. या रुग्णवाहिकांचा आपतकालीन परिस्थितीतही वापर केला जाईल, असे सांगत कोणत्याही रुग्णवाहिका बंद पडणार नाही याची दक्षता घेतली जाईल. तसेच रुग्णवाहिकांसाठी चालक उपलब्ध होण्यासाठी नियोजन पद्धतीने कार्यवाही केली जाईल, असेही प्रकाश आबिटकर यांनी स्पष्ट केले.राज्यातील खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्णांकडून आकारल्या जाणाऱ्या अवाजवी शुल्काचा मुद्दा विधानसभेत उपस्थित करण्यात आला. या चर्चेदरम्यान आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर (Prakash Abitkar) यांनी महात्मा फुले योजनांचे (Mahatma Phule Yojana) पॅकेजस वाढवून दिले आहे. लूटमार करणाऱ्या रुग्णालयांची माहिती द्या, आम्ही कारवाई करु, असे ठणकावून सांगितले. तसेच,राज्यातील सर्व खाजगी रुग्णालयांनी उपचारांचे दरपत्रक रुग्णांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावणे बंधनकारक आहे. मात्र उपचारांसाठी आकारल्या जाणाऱ्या शुल्कावर कोणतीही कमाल किंवा निश्चित मर्यादा नाही, विधानसभेत या संदर्भात काँग्रेस नेते नाना पटोले यांनी प्रश्न उपस्थित करत महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि पंतप्रधान जनआरोग्य योजना यांचा एकत्रित लाभ रुग्णांना मिळण्यासाठी सरकार काय उपाययोजना करणार, असा सवाल केला. तसेच या योजनांअंतर्गत उपचार मिळत असतानाही काही रुग्णालयांकडून रुग्णांकडून अतिरिक्त पैसे घेतले जात असल्याच्या अनेक तक्रारी असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

### मानधन वाढविण्याला प्राधान्य देणार

राज्यातील नागरिकांना तातडीने उपचार मिळावेत यासाठी लवकरच १४०० डॉक्टरांची भरती केली जाणार आहे. विशेष करून आदिवासी भागातील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर आणि तज्ज्ञ डॉक्टर्सही नेमण्याबरोबरच त्यांचे मानधन वाढविण्याला प्राधान्य देणार असल्याची घोषणा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधान परिषदेत केली. राज्यातील ग्रामीण रूग्णालयात गर्भवती महिलांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी डॉक्टर्स आणि तज्ज्ञ डॉक्टर्संचा असलेला अभाव आणि नादुरूस्त अवस्थेत असलेल्या रुग्णवाहिकासंदर्भात काँग्रेस आमदार राजेश राठोड यांनी विधान परिषदेत नियम ९३ अन्वये चर्चा उपस्थित केली होती.

## सैनिकी शाळांतील विद्यार्थ्यांचा भत्ता ५० हजारांपर्यंत वाढविणार

विदर्भ केसरी। मुंबई



राज्यातील सैनिकी शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या निर्वाह भत्त्यात ५० हजार रुपयांपर्यंत वाढ करण्याच्या हालचाली शासन स्तरावर सुरू आहेत. भत्ता वाढीबाबत संबंधित संस्थांसोबत बैठक घेऊन अंतिम निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी विधान परिषदेत दिली. केंद्र शासनाच्या संरक्षण विभागामार्फत देशभरात २०२५- २६ या शैक्षणिक वर्षात सांगली, नागपूर, अहिल्यानगर, सोलापूर, नाशिक, बीड, सिंधुदुर्ग आणि छत्रपती संभाजीनगर अशा एकूण ८ मान्यताप्राप्त शाळा महाराष्ट्रात आहेत.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत. अनुसूचित जाती- जमाती, विभक्त जाती व भटक्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी १५ हजार रुपये सामाजिक न्याय विभागाकडून दिले जातात. परंतु हे शिक्षण खर्चिक असून वार्षिक फी १ लाख रुपयांपेक्षा अधिक आहे. त्यामुळे राज्य सरकारने त्यात वाढ करावी, अशी मागणी शिवाजीराव गर्जे यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून परिषदेत केली. सैनिकी शाळांमधील विद्यार्थ्यांना दिला जाणारा निर्वाह भत्त्यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाकडून प्रस्ताव सादर केल्यानंतर दिला जातो. सध्या राज्यातील काही शाळांकडून अनेक प्रस्ताव प्रलंबित आहे. तर ज्यांचे प्रस्ताव आले त्या शाळांना भत्त्याचे वितरण पूर्ण केले आहे. तसेच शिष्यवृत्ती भत्ता १५ हजार वरून ५० हजार पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. लवकरच त्याची अंमलबजावणी केली जाईल. सन २०२५-२६ वर्षासाठी या योजनेसाठी ७.१५ कोटींची तरतूद केली असून पात्र विद्यार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे संजय शिरसाट यांनी सांगितले.राज्यातील सैनिकी शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या निर्वाह भत्त्यात ५० हजार रुपयांपर्यंत वाढ करण्याच्या हालचाली शासन स्तरावर सुरू आहेत. भत्ता वाढीबाबत संबंधित संस्थांसोबत बैठक घेऊन अंतिम निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी विधान परिषदेत दिली. केंद्र शासनाच्या संरक्षण विभागामार्फत देशभरात २०२५- २६ या शैक्षणिक वर्षात सांगली, नागपूर, अहिल्यानगर,८ मान्यताप्राप्त शाळा महाराष्ट्रात आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील विद्यार्थी येथे शिक्षण घेत आहेत.

## शिवजयंती महोत्सव तिथिनुसार कासवी गावात उत्साहात साजरा!

विदर्भ केसरी ।आरमोरी

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त आरमोरी तालुक्यातील मौजा कासवी गावामध्ये शिवजयंती महोत्सव मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात साजरा करण्यात आला. गावातील युवकवर्गांनी एकत्र येऊन या उत्सवाचे नियोजन केले होते. युवकांच्या पुढाकारातून केवळ उत्सव साजरा न करता विविध सामाजिक उपक्रमांचेही आयोजन करण्यात आले. शिवजयंतीच्या दिवशी सकाळी संपूर्ण गावातून भव्य शिवदिंडी काढण्यात आली. या शिवदिंडीमध्ये गावातील युवक, नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. शिवदिंडी दरम्यान छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची गाथा, शिवचरित्र आणि त्यांच्या आदर्श कार्याची माहिती गावातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आली. त्यामुळे गावात देशभक्ती आणि प्रेरणेचे वातावरण निर्माण झाले. यानंतर दिवसभर विविध शैक्षणिक व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. गावातील युवक व विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा तसेच सामाजिक ज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. तसेच महिलांसाठी व मुलींसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांना गावातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला



आणि मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. संध्याकाळच्या सत्रामध्ये या सर्व स्पर्धांतील विजेत्यांना मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी उपस्थित पाहुण्यांनी युवकांना मार्गदर्शन करताना छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि आदर्श आपल्या जीवनात अंगीकारण्याचे महत्त्व सांगितले. समाजातील ऐक्य, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी संपूर्ण गावकऱ्यांसाठी गावभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. गावातील सर्व नागरिकांनी एकत्र येऊन या भोजनाचा आस्वाद घेतला आणि उत्सवाचा समारोप आनंदात झाला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेले आपल्या गावातील नागरिक व सामाजिक कार्यकर्ते नंदूभाऊ नाकतोडे, कार्यक्रमाच्या उपाध्यक्ष लक्ष्मीताई मने, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भीमरावजी चहांदे पत्रकार, प्रवीणजी ठेंगरे उपसरपंच, राजेंद्र मने, आसारामजी प्रधान, दिनेश आठोळे, उद्धारामजी दिघोरे,अमिषाताई काडोर, चंद्रकांत डोनाडकर, बाजीराव सयाम, नारायण सयाम, गुलाब भोयर, राजेंद्र सयाम, लक्ष्मण कांदोर, सहदेव गुरनुले, वामन मरसकोल्हे, नारायण सयाम, शामराव बाडे, धनराज नंदनवार, हरीजी गुरनुले, किरण दिघोरे व गावातील नागरिक, उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन चंद्रशेखर प्रधान यांनी केले, व मंडळाचे सदस्य रोशन भोयर, आकाश दिघोरे, कुंदन नंदनवार, सुमित सयाम, धनवान दोनाडकर, अमित पुसाम, रोशन वाघाडे, शुभम कुमरे, आयुष दुपारे, नाजूक कांदुर, अमित गुरनुले, चेतन पुराम, रमाकांत जांबुडे, सतीश पुराम, कृष्णा दुपारे तोनील मटे, युगल मते, धर्मेश होकम, साहिल वाघमारे, प्रवीण होकम, अनिकेत दिघोरे, प्रीतम दिघोरे, मयूर पुराम, सुदर्शन सयाम, अशा प्रकारे युवकांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात येणाऱ्या सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमुळे गावात एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक जाणीव वाढण्यास मदत होते.

## VIA तपासणीत उपचार शिबिर यशस्वीरीत्या संपन्न

विदर्भ केसरी। गडचिरोली



"वी केअर अँड क्युअर" या उपक्रमांतर्गत जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली येथे दिनांक १७/०३/२०२६ रोजी व्हिज्युअल इन्स्पेक्शन ऑफ ॲसिटिक ॲसिड (VIA) या तपासणीत पॉझिटिव्ह आढळलेल्या महिलांसाठी विशेष उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. VIA ही एक सोपी, किफायतशीर आणि प्रभावी तपासणी पद्धत असून ग्रामीण व दुर्गम भागातील महिलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. या तपासणीत पॉझिटिव्ह निष्कर्ष आलेल्या महिलांना वेळेत उपचार मिळावेत आणि कर्करोग होण्यापूर्वीच आजारावर नियंत्रण मिळवता यावे, हा या शिबिरामागील प्रमुख उद्देश होता. सदर शिबिर जिल्हा शल्य चिकित्सक तथा (राज्य आयएमए - एचपीव्ही लसीकरण, गर्भाशय मुख व स्तन कर्करोग समिती अध्यक्षा) डॉ. वर्षा लहाडे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडले. त्यांच्या नेतृत्वाखाली तज्ञ डॉक्टरांच्या पथकाने अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने शिबिराचे आयोजन केले. या शिबिरामध्ये चामोर्शी तालुक्यातील १३ महिलांची तपासणी करून त्यांच्यावर आवश्यक त्या वैद्यकीय उपचारांची अंमलबजावणी करण्यात आली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. वर्षा लहाडे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. आखाडे व भूलतज्ज्ञ डॉ. साखरे यांनी उपचार प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली. या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी ग्रामीण रुग्णालय चामोर्शीचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रवीणकुमार किलनाके तसेच तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. महेंद्र पेड्डुला यांचे तसेच महिला वार्ड क्र. 10 व ओटी मधील स्टाफ विशेष सहकार्य लाभले. तसेच स्थानिक स्तरावर रुग्णांची निवड, समुपदेशन व उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले. याशिवाय राजेंद्र अल्लीरवार, सुकेशनी आत्राम (चामोर्शी), श्रीदेवी तुप्पलवार (आष्टी) यांनी क्षेत्रीय समन्वयात सहकार्य केले. जिल्हा सामान्य रुग्णालयातील एनसीडी विभागातील डॉ. प्रेरणा राऊत, वैशाली बोबाटे, शिल्पा सरकार, शीतल काळबांधे तसेच महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना अंतर्गत मंगेश नैताम यांनी शिबिराच्या यशस्वितेसाठी विशेष परिश्रम घेतले. या शिबिरामुळे महिलांमध्ये गर्भाशय मुख कर्करोगाबाबत जागरूकता वाढण्यास मदत झाली असून लवकर निदान व तात्काळ उपचार याचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. अशा प्रकारचे उपक्रम भविष्यातही राबवून महिलांचे आरोग्य अधिक सुदृढ करण्यासाठी आरोग्य विभाग कटिबद्ध आहे. असे जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली यांनी कळविले आहे.

## 'शुद्धलेखन' दुरुस्तीच्या नावाखाली घोटाळा!

### पुणे विभागातच ३६ हजार प्रकरणं; बावनकुळेंनी केला खुलासा

विदर्भ केसरी। मुंबई

राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू आहे. या अधिवेशनात आरोप-प्रत्यारोप केले जात आहेत. यादरम्यान राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेच्या सभागृहात त्यांच्याच विभागात झालेल्या एका घोटाळ्याबद्दल माहिती दिली आहे. महसूल खात्यात प्रचंड मोठा घोटाळा झाल्याची माहिती राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषद सभागृहात दिली. शुद्धलेखनात बदल करण्याच्या नियमाचा वापर करून एका व्यक्तिची जमीन दुसऱ्या व्यक्तिच्या नावावर केल्याची हजारो प्रकरणे तपासली जात असल्याचेही बावनकुळे म्हणाले आहेत. चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना या घोटाळ्याबद्दल



सविस्तर माहिती दिली. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, "महसूल संहिता एमएलआरसी कोडमध्ये १५५ व्या कलमात तहसीलदाराला एक अधिकार आहे, ज्यामध्ये शुद्धलेखनात जर चूक झाली तर दुरूस्त करता येते.

म्हणजे एखाद्या नावात चूक झाली किंवा आडनावात चूक झाली तर ती दुरूस्त करण्याचा अधिकार तहसीलदारांना आहे. पण यांची जमीन त्यांच्या नावाने करून देणे १५५ च्या नियमात बसत नाही, अशी वेगवेगळ्या पद्धतीची प्रकरणे १५५ खाली आढळली आहेत. पुणे विभागात आम्ही ३६ हजार प्रकरणं आम्ही ओळखली आहेत. त्यामधील जवळपास ३ हजार प्रकरणे आम्ही तपासली आहेत. जवळपास ५०० प्रकरणांमध्ये गंभीर दोष आढळून आले आहेत," असे बावनकुळे म्हणाले.विभागीय आयुक्त, नाशिक यांची एक समिती आम्ही तयार केली होती. या समितीने हा संपूर्ण रिपोर्ट शासनाला दिला आहे. काय कारवाई करावी या शिफारसी देखील यामध्ये आहेत, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.राज्याच्या संपूर्ण महसूल विभागांचा विचार केला तर फक्त पुणे विभागाची चौकशी केली आहे. मग नाशिक, मराठवाडा, विदर्भ आणि कोकणात असे किती प्रकरणे आहेत? याचाही तपास पुढील तीन महिन्यात विभागीय आयुक्तांची समिती करणार आहे. आता पहिला तपास फक्त पश्चिम महाराष्ट्राचा झाला आहे, तोही फक्त तीन हजार प्रकरणांचा झाला आहे. यामध्ये जे अधिकारी आहेत त्यांच्यावर काय करावाई करणार याबद्दलचा शासन निर्णय करणार आहे, असे बावनकुळे म्हणाले. एकंदरीत मागच्या पाच वर्षांमध्ये, म्हणजे मी मंत्री होण्यापूर्वीचे पाच वर्ष, किंवा त्यापूर्वीचे अनेक वर्ष या अधिकाऱ्यांनी दुरुपयोग केला आहे, यावर योग्य कारवाई सरकार करणार आहे. ॲक्शन टेकन रिपोर्ट मी सभागृहामध्ये सादर करणार आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. राज्यामध्ये जवळपास एक ते दीड लाख प्रकरणे निघतील, असेही चंद्रशेखर बावनकुळे यावेळी म्हणाले.

## गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला गडचिरोलीत बाईक रॅलीचे आयोजन

विदर्भ केसरी। गडचिरोली

मराठी नववर्ष व गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला दि. १८ मार्च २०२६ रोजी (बुधवार) दुपारी ३.०० वाजता आधारविश्व फाउंडेशन आणि लोकमत सखी मंच, गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी लवकरात लवकर आपली नावे नोंदवावीत, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. रॅलीचा प्रारंभ परिणीता लॉन, आरमोरी रोड येथून होणार असून सहभागी महिलांनी फेटे लावण्यासाठी दुपारी २.०० वाजता उपस्थित राहावे. रॅली दुपारी ३.०० वाजता सुरू होणार आहे. या रॅलीसाठी पारंपरिक महाराष्ट्रीयन वेशभूषा अनिवार्य ठेवण्यात आली



असून लुगडं, साडी, नथ अशा पारंपरिक पोशाखात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. रॅलीचा मार्ग पुढीलप्रमाणे असेल : परिणीता लॉन (आरमोरी रोड) येथून प्रारंभ होऊन इंदिरा गांधी चौक, चंद्रपूर रोड आयटीआय चौक, त्यानंतर परतीच्या मार्गाने इंदिरा गांधी चौकातून धानोरा रोड, शिवाजी महाविद्यालय, रेड्डी गोडाऊन, पोटेगाव बायपास, चामोर्शी रोड मार्गे साई मंदिर येथे समारोप करण्यात येणार आहे. समारोपानंतर सहभागींसाठी अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी पुढील संपर्क साधावा : १) प्रा. सुनिता साळवे – ९४२३१२२९३४ (सचिव, आधारविश्व फाउंडेशन) २) प्रा. वीणा महाजन – ९४२२७०९००० (उपाध्यक्ष, आधारविश्व फाउंडेशन) ३) प्रा. विजया मने – ९४२१७३४४३४ (आधारविश्व फाउंडेशन) ४) रश्मी आखाडे – ७०३८६४७७३३ (जिल्हा संयोजिका, लोकमत सखी मंच) ५) भाग्यश्री गड्डमवार – ९४०५१५५६२८ (जिल्हा संयोजिका, लोकमत कॅम्पस क्लब)

या उपक्रमामुळे गुढीपाडवा सण उत्साहात साजरा करताना पारंपरिक संस्कृतीचा सन्मान व महिलांचा सहभाग अधोरेखित होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.